# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०२३

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**मंगळवार, दिनांक २१ मार्च, २०२३ / फाल्गुन ३०, १९४४ ( शके )**

**मुख्यमंत्री :- यांचे प्रभारी विभाग**

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ३६**

---

**पळसखेड मलकदेव (ता.सिंदखेडराजा, जि.बुलढाणा) येथे चार तालुक्यांना जोडणाऱ्या पोच मार्गाला जउळखेड ते असोला फाटा मार्ग जोडण्याबाबत**

**(१) * ५९६०४ श्रीमती श्वेता महाले (चिखली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृध्दी महामार्गावरुन पळसखेड मलकदेव (ता.सिंदखेडराजा, जि.बुलढाणा) येथे चिखली, बुलढाणा, मोताळा व मलकापूर या तालुक्यांना जोडण्यासाठी (पोच मार्ग) इंटरचेंज तयार करण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर इंटरचेंज वरुन चिखली, बुलढाणा, मोताळा व मलकापूर येथे जाण्यासाठी सिंदखेडराजा, देऊळगावराजा या राज्य मार्गावरुन पुढे जालना-मलकापूर या केंद्रीय मार्गाने देऊळगांवराजा पुढे असोला फाटयावरुन जावे लागत असून वाहतुकीची कोंडी होत असल्यामुळे प्रवाशांची गैरसोय होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर इंटरचेंज पासून जउळखेड मार्गे ते असोला फाटा हे अंतर अंदाजे ८ कि.मी. इतके आहे तसेच या इंटरचेंज पासून पळसखेड झाल्टा मार्गे असोला फाटा येथे गेले असता हे अंतर सुध्दा ८ कि.मी. इतके असल्याने चिखली, बुलडाणा, मोताळा, मलकापूर या तालुक्यांना जाण्यासाठी १५ कि.मी अंतर कमी होवून २० ते २५ मिनीटे इतका वेळ वाचून एक नविन रस्ता उपलब्ध होऊ शकतो, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर इंटरचेंजला जउळखेड मार्गे ते असोला फाटा किंवा पळसखेड झाल्टामार्गे असोला फाटा मार्ग जोडण्यात यावा अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.मुख्यमंत्री आणि मा.उपमुख्यमंत्री यांच्याकडे दिनांक २० ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) होय, हे अंशत : खरे आहे.
(२) हे खरे नाही. देऊळगावराजा येथील वळणरस्ता (बायपास) वाहतुकीसाठी उपलब्ध असल्याने वाहतुक कोंडी होऊन प्रवाशांची गैरसोय होत आहे, हे म्हणणे संयुक्तिक ठरणार नाही.

(३) हे अंशत: खरे आहे. इंटरचेंज पासुन जउळखेड मार्गे ते असोला फाटा (१२ कि.मी) किंवा इंटरचेंज पासुन पळसखेड झाल्टा मार्गे असोला फाटा (९ कि.मी.) हे अस्तित्वातील प्रजिमा, इजिमा, ग्रामा दर्जाचे रस्ते असुन संबधित यंत्रणांनी त्यांची सुधारणा केल्यास जवळपास १५ कि.मी. अंतर कमी होऊन वेळ वाचु शकेल.

(४) अंशत: खरे आहे.

अशा मागणीचे निवेदन/पत्र मा.उपमुख्यमंत्री महोदयांना दिल्याचे दिसून येते.

(५) सिंदखेडराजा ते असोला फाट्यापर्यंतचे रस्ते (पळसखेड झाल्टामार्गे अथवा जउळखेडमार्गे) महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या अधिकार क्षेत्रात येत नाहीत. त्यामुळे महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडून कार्यवाही करण्यात आलेली नाही. तथापि, सध्याच्या उपरोक्त उपप्रश्न १ मध्ये नमुद इंटरचेंज पासुन जउळखेड मार्गे ते असोला फाटा (१२ कि.मी) किंवा इंटरचेंज पासुन पळसखेड झाल्टा मार्गे असोला फाटा (९ कि.मी.) हे अस्तित्वातील प्रजिमा, इजिमा, ग्रामा दर्जाचे रस्ते असुन संबधित यंत्रणांनी (सार्वजनिक बांधकाम विभाग व ग्राम विकास विभाग) त्यांची सुधारणा केल्यास जवळपास १५ कि.मी. अंतर कमी होऊन वेळ वाचु शकेल. शासनाच्या निधी व निकषाच्या अधिन राहून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

-----------------

## पहुर (ता.रोहा, जि.रायगड) कालव्यासाठी भूसंपादन न केल्यामुळे कालव्याअभावी सिंचनाचे उद्दीष्ट पूर्ण झाले नसल्याबाबत

**(२) * ५७९५१ श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.सुनील राणे (बोरीवली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पहुर (ता.रोहा, जि.रायगड) येथे मृद व जलसंधारण विभागाने रुपये १५ कोटी २० लाख खर्च करुन माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान धरण बांधले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ४.२२ कि.मी.च्या कालव्यासाठी भूसंपादन न केल्यामुळे तसेच जिल्हाधिकाऱ्यांकडून मुंबई-दिल्ली औद्योगिक कॉरिडॉरसाठी भूसंपादन प्रक्रिया सुरू होऊन त्यानंतर भूसंपादन केल्यामुळे मृद व जलसंधारण विभागाचे कालव्याअभावी ११७ हेक्टर जमीन सिंचित करण्याचे उद्दिष्ट पूर्ण झाले नसल्याने सिंचनासाठी केलेला खर्च वाया गेल्याचे दिनांक ३१ मार्च, २०२१ रोजीच्या लेखा परिक्षण अहवालात आढळून आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) सन २०१३ मध्ये प्रस्तुत प्रकल्पाच्या कालव्याच्या बांधकामाला शेतकऱ्यांच्या विरोधामुळे व स्थानिक लोकप्रतिनिधींनी त्यावेळी केलेल्या विनंतीवरुन कालव्याची लांबी ४.२२ कि.मी. वरुन १.४५ कि.मी. करण्यात आली. तथापि, सदर १.४५ कि.मी. लांबीच्या कालव्याच्या भूसंपादनाला देखील स्थानिक शेतकऱ्यांनी सतत विरोध केल्याने प्रस्तुत कालव्याचे भूसंपादन करणे शक्य झाले नाही. सद्यस्थितीत दिल्ली-मुंबई औद्योगिक कॉरिडॉर (DMIC) साठी प्रकल्पाच्या लाभक्षेत्रातील जमीन संपादित झाली असल्याने सिंचन करणे शक्य नाही. मात्र भविष्यात DMIC कडून पाण्याची मागणी प्राप्त झाल्यास सदर पाणीसाठा हा औद्योगिक वापरासाठी DMIC ला देणे किंवा सदर प्रकल्प मालकी हक्काने DMIC ला हस्तांतरीत करुन प्रकल्प खर्चापेक्षा जास्त महसूल गोळा

करणे शक्य आहे. याशिवाय दरवर्षी निजामपूर ग्रामपंचायतीला मागणीनुसार पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करुन त्याव्दारे महसूल प्राप्त होत आहे. तसेच मत्स्यव्यवसायासाठी सदर प्रकल्प मत्स्य विभागास देण्याची प्रक्रिया प्रगतीपथावर आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील सर्वच उद्यानांमध्ये स्वच्छतागृह, पाणपोई तसेच पथ दिव्यांची सोय करण्याबाबत**

**(३) * ६३४९८ डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील सर्वच उद्यानांमध्ये पुरेशी स्वच्छतागृहे तसेच पिण्याच्या पाण्याची सोय उपलब्ध नसल्यामुळे उद्यानात येणाऱ्या नागरीकांची विशेषकरुन आबालवृध्दांची मोठया प्रमाणात गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अंधेरी (पश्चिम) वर्सोवा येथील पोशा नाखवा मैदानात स्वच्छतागृह, पाणपोईची सुविधा तसेच विद्युत दिवे यांची कमतरता असून यासंदर्भात स्थानिक नागरीकांनी वारंवार प्रशासनाकडे निवेदने दिली आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी चौकशी करुन त्यानुषंगाने उक्त ठिकाणी स्वच्छतागृह, पाणपोई व पथदिव्यांची सोय करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळिविले आहे.
(२) नागरिकांनी वारंवार निवेदने दिली आहेत, ही बाब खरी नाही असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.
(३) अंधेरी (प.) वर्सोवा येथील पोशा नाखवा मैदानात सद्य:स्थितीत पथदिवे उपलब्ध असून ते चालू स्थितीत आहेत. तथापि सदर मैदानातील बंद असलेले ४ हायमास्ट दिव्यांच्या दुरस्तीकरिता निविदा मागविण्यात आली आहे.
तसेच, सदर उद्यानात स्वच्छतागृह व पाणपोईची सुविधा पुरविण्याकरिता प्राधान्याने कार्यवाही करण्यात येईल, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मुंबईतील दहिसर, ओशिवरा व पोईसरसह मिठी नदी परिसरातील गोठयांमधील सांडपाण्यामुळे वाढलेले प्रदूषण**

**(४) * ५६८६२ डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अजित पवार (बारामती), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील दहिसर, ओशिवरा, पोईसरसह मिठी नदी परिसरात असलेल्या गुरांच्या गोठयातील मलमूत्र नद्यांमध्ये सोडण्यात येत असल्याने चितळे आयोगाने केलेल्या शिफारशीनुसार या नद्यांमधील प्रदूषणाचे प्रमाण

कमी करण्यासाठी ट्रीटमेंट प्लान्ट लावण्याची कार्यवाही केली नसल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू नदीत सोडलेल्या सांडपाण्यामुळे दुर्गंधी पसरुन प्रदुषणात मोठया प्रमाणात वाढ होत झाली असून नदीच्या आसपासच्या परिसरात राहणाऱ्या नागरिकांचे आरोग्य धोक्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले त्यानुषंगाने चितळे आयोगाच्या शिफारशीनुसार नद्यांमधील प्रदूषणाचे प्रमाण कमी करण्यासाठी ट्रीटमेंट प्लान्ट उभारण्याबाबत कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) मुंबईतील दहिसर, ओशिवरा, पोईसरसह मिठी नदी परिसरात हरित लवादाने नेमून दिलेल्या शिफारशीनुसार सांडपाण्यावर प्रक्रिया करण्याकरिता मलजल प्रकल्प केंद्र उभारण्याची कार्यवाही सुरु आहे, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळिविले आहे.
(२) मुंबईतील दहिसर, ओशिवरा, पोईसरसह मिठी नदी परिसरात असलेल्या गोठ्यातील शेण व सांडपाणी नद्यांमध्ये सोडल्यामुळे दुर्गंधी व प्रदुषणात वाढ व नदीच्या परिसरात राहणाऱ्या नागरिकांच्या आरोग्याची समस्या उद्भवण्याची शक्यता असते. तथापि रुग्णसंख्या पाहता आरोग्याची समस्या उद्भवल्याचे निदर्शनास येत नाही, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.
(३) नद्यांमधील शेणाचे प्रमाण कमी करण्यासाठी नदी शेजारील तबेले मुंबई क्षेत्राबाहेर स्थापित करण्याच्या सूचना असल्यामुळे तबेले / गोठेधारकांना यासाठीचे परवाने देण्यात येत नाहीत. त्यामुळे चितळे समितीने सुचविल्याप्रमाणे बायोगॅस संयंत्र बसविण्याचा आग्रह करता येत नाही.
बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत शेणमिश्रित पाण्याव्यतिरिक्त सांडपाण्यावर प्रक्रियाकरिता मलजल केंद्राची उभारणी करण्यात येत आहे.
तथापि, शेणमिश्रित पाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी ट्रीटमेंट प्लान्टच्या उभारणीकरिता संबंधित गोठे मालक प्रतिसाद देत नाहीत. त्यामुळे नदी पुनरुजीविकरण सल्लागाराकडून शेणमिश्रित पाण्यावर प्रक्रिया करण्याच्या ट्रीटमेंट प्लांटचा अहवाल मागविण्यात आला असून, सदर अहवाल प्राप्त होताच पुढील कार्यवाही करण्यात येणार आहे, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील संत्रा उत्पादक शेतकऱ्यांना नुकसान भरपाई व संत्रा पिकास बाजारभाव देण्याबाबत

**(५) * ६३३०१ श्री.देवेंद्र भुयार (मोर्शी), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातून दरवर्षी १.२५ ते १.५० लाख टन संत्रा बांगलादेशात निर्यात होत असून तेथील सरकारने संत्रा आयात शुल्कात प्रचंड वाढ केल्यामुळे संत्रा निर्यात बागायतदारांचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान होत असल्याचे नुकतेच निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बांगलादेश सरकारने संत्र्याचे आयात शुल्क रुपये ५४/- प्रति किलो इतके करुन त्यातही आभाराचे पत्र (Letter Of Credit) देणे बंद केल्यामुळे संत्रा निर्यात ठप्प होऊन देशांतर्गत बाजारपेठेत संत्र्याचे दर अत्यंत कमी झाले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी संत्रा उत्पादक शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळण्याबाबत तसेच संत्रा पिकास योग्य बाजारभाव मिळण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे.
(२) अंशत: खरे आहे. बांगलादेशात होणारी संत्रा निर्यात ठप्प झालेली नसून, सन २०२०-२१ च्या तुलनेत सन २०२१-२२ मध्ये निर्यात कमी झाल्यामुळे देशांतर्गत बाजारपेठेत संत्र्याचे दर कमी झाले आहेत.
(३) आयात शुल्क हा विषय केंद्र शासनाच्या अखत्यारीतील असल्याने, बांगलादेश सरकारने संत्र्यावरील आयात शुल्क कमी करण्याच्या अनुषंगाने कार्यवाही करण्याची विनंती, राज्य शासनाने दिनांक १६.११.२०२२ रोजीच्या पत्रान्वये केंद्र शासनाच्या वाणिज्य विभागाच्या अपेडा या संस्थेस केली आहे. सदर बाब वाणिज्य मंत्रालय, भारत सरकार यांच्या निदर्शनास आणून त्यांना बांगलादेश सरकारशी चर्चा करण्याची विनंती केली असल्याचे अपेडा यांनी कळविले आहे.

तसेच, राज्य शासनाने संत्रा पिकास आंतरराष्ट्रीय तसेच देशांतर्गत बाजारपेठेत योग्य बाजारभाव मिळण्यासाठी राज्याच्या कृषि निर्यात धोरणामध्ये संत्र्याचा समावेश केला असून, कृषी पणन मंडळाकडून हॉर्टीकल्चर एक्सपोर्ट ट्रेनिंग कोर्स अंतर्गत संत्रा उत्पादक, उत्पादक कंपन्या, व्यापारी इ. यांना प्रशिक्षण देण्यात येत आहे. तसेच, संत्रा निर्यात सुविधा केंद्रे उभारणे, आशियाई विकास बॅक सहाय्यित मॅग्नेट प्रकल्पांर्गत संत्र्याची व्यावसायिक दृष्ट्या मुल्यसाखळी विकसित करणे, सिट्रसनेट प्रणाली विकसित करणे इ. उपाययोजना करण्यात येत आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

### राज्यातील काही शहरी भागात भटक्या कुत्र्यांच्या संख्येत वाढ होत असल्याबाबत

**(६) * ६२८८३ श्री.सुनिल कांबळे (पुणे कॅन्टोन्मेंट), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात विशेषतः शहरी भागात भटक्या कुत्र्यांच्या संख्येत दिवसेंदिवस वाढ झालेली असून नागरिकांना मोठ्या प्रमाणावर त्याचा त्रास सहन करावा लागत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ठिकठिकाणी श्वानदंशाच्या घटना घडत असून लहान मुले, ज्येष्ठ नागरिकांसह सर्वसामान्य नागरिक यात जखमी होत असून भटके कुत्रे मागे लागल्याने वाहनांचे अपघातही मोठ्या प्रमाणात होत असून ‘भटक्या कुत्र्यांचा बंदोबस्त करावा’ अशी मागणी नागरिकांनी वारंवार स्थानिक प्रशासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच पुणे महानगरपालिका हद्दीमध्ये पुणे शहर आणि उपनगरातील भटक्या कुत्र्यांकडून हजारो नागरिकांवर हल्ले झाल्याचे माहे फेब्रुवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन भटक्या कुत्र्यांसंदर्भात उपाययोजना करुन त्यांचे निर्बिजीकरण करणे, श्वानगृहे तयार करणे, प्राणीप्रेमी संस्था व व्यक्तींना दत्तक योजनेस प्रोत्साहन देणे तसेच श्वानदंशाची लस व औषधोपचार शासकीय दवाखान्यांमध्ये मोफत उपलब्ध करुन देण्याकरीता प्रभावी उपाययोजना करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) व (२) होय, अंशत: खरे आहे

राज्यातील काही नागरी स्थानिक स्वराज्य संस्था यांच्याकडील प्राप्त अहवालानुसार अशा प्रकारच्या तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत. या तक्रारी प्राप्त झाल्यानंतर त्याबाबतची आवश्यक ती कारवाई संबधित नागरी स्वराज्य संस्थाकडून तातडीने करण्यात येते.

(३) होय, हे खरे आहे.

पुणे महानगरपालिकेच्या प्राप्त अहवालानुसार भटक्या कुत्र्यांकडून नागरिकांवर हल्ले होण्याचे प्रमाण वाढल्याचे दिसुन आले आहे.

(४) नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाकडून एकुण ५७,३६१ कुत्र्यांना नसबंदी व लसीकरण करुन त्यांच्या मूळ ठिकाणी सोडण्यात आले आहे. नगरपरिषद/नगरपंचायत व महानगर पालिकेच्या पशुरुग्णालय व रेबीज प्रतिबंधक लसीकरण पथकामार्फत प्राणी प्रेमी व प्राणी कल्याण संस्था यांच्या समन्वयाने श्वानांचे लसीकरण, निर्बिजीकरण व रेबीज इंजेक्शनचे लसीकरण करण्यात येते. नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेतील काही महानगर पालिकांनी प्राणी सुश्रूषा केंद्रे स्थापन करुन तसेच भटक्या श्वानांची देखभाल व आहार व्यवस्था स्वयंसेवी संस्थांमार्फत देखील मोफत करण्यात आली आहे. NGO यांच्या मदतीने श्वान दत्तक कॅम्प आयोजित करण्यात येतात. नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये व शासकीय उपजिल्हा रुग्णालय येथे श्वानदंशाची लस मोफत उपलब्ध करुन देण्यात येते.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## भुसावळ येथील दीपनगर औष्णिक वीज प्रकल्पातील राखेमुळे प्रदूषणात होत असलेली वाढ

**(७) * ६२७८० श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भुसावळ येथील दीपनगर औष्णिक वीज प्रकल्पातील राख पाईपलाईनमधुन वेल्हाळे परिसरात ॲश बंडमध्ये सोडली जात असून अतिदाबामुळे ही पाईपलाईन फुटते व चोकअप काढल्यामुळे वेल्हाळे परिसरातील नद्या, नाले, व तलावात राख वाहून येत असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कारणास्तव संयुक्त प्रदूषण संघर्ष समिती आणि इतरही नागरिकांनी याबाबत सन २००९ पासून वारंवार आंदोलने केल्यानंतर देखील दीपनगर केंद्राने राखेच्या प्रदूषणाचा प्रश्न पूर्णपणे सोडविला नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन प्रदूषण रोखण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अहवालानुसार, दि.१५ जानेवारी २०२२ रोजी, सदर पाईपलाईन मधून फ्लॉय स्लरी गळती झाल्याची घटना घडली होती व काही प्रमाणात ॲश स्लरी परिसरात पसरली होती, हे खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

भुसावळ औष्णिक वीजनिर्मीती प्रकल्पामधून निघणाऱ्या राखेच्या (Bottom Ash) प्रदूषणाबाबत वेळोवेळी तक्रारी मंडळाकडे प्राप्त झाल्या आहेत. मंडळाकडून सदर तक्रारींवर वेळोवेळी पाहणी करुन कार्यवाही करण्यात आलेली आहे. सदर प्रकल्पाने ॲश स्लरी प्रकल्पापासून वेल्हाळे येथील ॲश बंड पर्यंत वाहून नेण्यासाठी टाकलेल्या पाईपलाईन मधून कधी कधी गळती होते व गळती आणि तुटफुट दुरुस्तीचे काम करणेकरीता २४ X ७ तत्वावर कंत्राट दिलेले आहे. तसेच गळतीच्या घटनेमुळे वाहून गेलेली ॲश स्लरी जमा करुन त्वरीत ॲशबंडमध्ये टाकण्याचे काम कंत्राटी पद्धतीवर दिलेले आहे. प्रकल्पाकडून वेळोवेळी ॲश गळतीच्या ठिकाणी दुरुस्तीचे काम त्वरीत करण्यात येते.

(३) वेल्हाळे शिवारात राख वाहिनी फुटल्याबाबतची बातमी दि.१७/०१/२०२२ रोजी वर्तमानपत्रात प्रसिद्ध झाली होती. त्या अनुषंगाने मंडळाकडून दि.१७/०१/२०२२ रोजी घटना स्थळाची पाहणी करण्यात आली होती. पाहणीच्या वेळी असे समजले की, प्रकल्पापासून सुमारे १० किमी अंतरावर राख वाहिनी फुटली होती व ॲश स्लरी परिसरामध्ये पसरल्याचे अंश दिसून आले आणि राख वाहिनीची दुरुस्ती केलेली असल्यामुळे गळती थांबलेली होती. सदर घटनेच्या अनुषंगाने मंडळाने या प्रकल्पास कारणे दाखवा नोटीस बजावली होती. तथापि, पुन्हा तक्रारी प्राप्त झाल्यामुळे सदर प्रकल्पास प्रस्तावीत निर्देश पारित केले आहेत. तसेच मंडळाने संमतीपत्रातील अटी व शर्तींचे उल्लंघन केल्यामुळे रक्कम रु. २५.०० लक्षची बँक हमी जप्त केली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नाशिक महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागातील फायरबॉल खरेदीत झालेल्या अनियमिततेबाबत

**(८)** * **६२९४९ श्री.नितीन अर्जुन (ए.टी.) पवार (कळवण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक महानगरपालिकेतील अग्निशमन विभागात फायरबॉल खरेदी प्रक्रियेत अनियमितता झाल्याचे माहे फेब्रुवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खुल्या बाजारात दीड हजार रुपये किंमत असलेले फायरबॉल अवाजवी दराने खरेदी करुन दोन वर्षापासून विनावापर पडून असताना नव्याने १९ लाख रुपयांचे फायरबॉल खरेदी करण्यात आले असून याप्रकरणी अनियमितता झाली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अग्निशमन विभागाने दोन वर्षापूर्वी खरेदी केलेले १३९१ फायरबॉल पडून असताना नवीन फायरबॉल खरेदी करण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, या संपूर्ण प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) नाशिक महानगरपालिकेमार्फत खरेदी करण्यात आलेले फायरबॉल हे रेडमॅटीक कंपनीचे असून त्याची जी.एम. पोर्टलवर आजची किंमत रु.७५००/- इतकी आहे.

मात्र, महानगरपालिकेने सन २०२० मध्ये निविदा प्रक्रिया राबवून त्यापेक्षा कमी दराने १.५ कि.ग्रॅ. वजनाचे फायरबॉल खरेदी केलेले आहे.

सदर फायरबॉलची वैधता ५ वर्षांची आहे.

महानगरपालिका प्रशासकीय कार्यालये, हॉस्पिटल, नर्सिंग होम, नाट्यगृह अशा वर्दळीच्या ठिकाणी एकूण १३९१ फायरबॉल बसविण्यात आलेले असून ते कार्यक्षम आहेत. तसेच, कुठलाही फायरबॉल पडून नाही.

महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य अधिकारी यांनी महानगरपालिकेच्या प्राथमिक आरोग्य केंद्र या ठिकाणी फायर ऑडीट करुन फायरबॉल बसविण्याची मागणी केल्याने, त्या ठिकाणी सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून सन २०२३ मध्ये फायरबॉल बसविण्याचे प्रस्तावित आहे.

यासाठी नव्याने फायरबॉल खरेदी करण्याची प्रक्रिया चालु असून, महानगरपालिकेमार्फत अद्याप निविदा प्रक्रिया राबविण्यात आलेली नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळात (एसटी) प्रभारी अधिकाऱ्यांवर कामकाज सोपविल्याने महामंडळाच्या उत्पन्नावर विपरीत परिणाम झाल्याबाबत

**(९) * ५७६०१ श्री.बंटी भांगडिया (चिमूर), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.किसन कथोरे (मुरबाड), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.विनोद अग्रवाल (गोंदिया), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.कृष्णा गजबे (आरमोरी), श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.नितेश राणे (कणकवली), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्रीमती श्वेता महाले (चिखली), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्यमार्ग परिवहन महामंडळात (एसटी) प्रभारी अधिकाऱ्यांवर कामकाज सोपविण्यात आले असल्याने त्याचा विपरीत परिणाम महामंडळाच्या उत्पन्नावर होत असल्याची बाब माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील तब्बल ११३ आगारांचे काम प्रभारी अधिकाऱ्यांवर सोपविण्यात आले असल्याने एका अधिकाऱ्याला दोन अथवा त्यापेक्षा जास्त पदांचा पदभार सांभाळावा लागत असल्याने प्रभारी अधिकाऱ्यांचे महामंडळाच्या कामकाजावर नियंत्रण राहिलेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त परिस्थितीमुळे राज्यात सर्वत्र वाहतूक व्यवस्था विस्कळीत होऊन ग्रामीण भागातील एसटीच्या अनेक फेऱ्या वारंवार रद्द होत असल्याने सर्वसामान्य नागरिकांना मोठा आर्थिक भुर्दंड बसत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार एसटी महामंडळातील सर्व आगारातील रिक्त पदे तातडीने भरण्यासाठी आणि प्रतीक्षा यादीत असलेल्या सर्व वाहन चालकांना सामावून घेण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) व (२) राज्य मार्ग परिवहन महामंडळामध्ये सद्यस्थितीत १८७ आगार व्यवस्थापक कार्यरत असून ६३ आगारांच्या आगार व्यवस्थापक पदांचा अतिरिक्त कार्यभार अन्य अधिकाऱ्यांकडे सोपविलेला आहे. मात्र त्याचा परिणाम राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या उत्पन्नावर होत नाही.

(३) नाही.

(४) व (५) आगार व्यवस्थापकांची रिक्त पदे बढतीने भरण्याची कार्यवाही सुरु आहे.

महामंडळ ठराव क्र.२०२१:१०:१६ दि.२८.१०.२०२१ अन्वये भरती प्रक्रियेतील घटकसंवर्गातील उमेदवारांना आवश्यकतेनुसार रा.प.महामंडळात सामावून घेण्यास मा.संचालक मंडळाने मंजुरी दिली आहे. त्यानुसार सरळसेवा भरती सन २०१९ अंतर्गत चालक तथा वाहक पदातील उमेदवारांना नेमणूका देण्याबाबतची कार्यवाही विभागीय स्तरावर सुरु आहे.

-----------------

**उस्मानाबाद (धाराशिव) जिल्ह्यात बंधारे दुरुस्तीकरीता निधी मंजूर करण्याबाबत**

**(१०) * ५८०९७ श्री.राणाजगजीतसिंह पाटील (तुळजापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उस्मानाबाद (धाराशिव) जिल्ह्यातील जिल्हा परिषदेकडील कोल्हापूर पद्धतीच्या बंधारे दुरुस्तीकरीता रुपये ४१.५० कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १८ नोव्हेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास शासनाकडे मागणी केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उस्मानाबाद (धाराशिव) जिल्ह्याचे अल्प पर्जन्यमान विचारात घेऊन तत्कालीन पाटबंधारे मंत्री यांनी जिल्ह्यात १००० हून अधिक कोल्हापूर पद्धतीचे बंधारे बांधले असून यातील अनेक बंधाऱ्यांना गेट नाहीत, काहींची स्थापत्य दुरुस्ती अत्यावश्यक आहे तसेच ६७१ कोल्हापूर पद्धतीच्या जिल्हा परिषदेकडील बंधाऱ्यांची मागील अनेक वर्षापासून दुरुस्ती न झाल्याने करोडो रुपयांची मालमत्ता पूर्ण क्षमतेने उपयोगात नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या बंधाऱ्यांची दुरुस्ती केल्यास जिल्ह्यातील सिंचन क्षेत्रामध्ये मोठी वाढ होऊ शकते, तसेच भूगर्भ पातळीतील जलसाठ्यामध्ये देखील वाढ होऊ शकते त्यामुळे जिल्हा परिषद लघु पाटबंधारे विभाग उस्मानाबाद (धाराशिव) यांच्याकडून या ६७१ कोल्हापूर पद्धतीच्या बंधाऱ्यांच्या दुरुस्तीचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून यासाठी रु.४१.५० कोटी रुपयांची आवश्यकता आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले त्यानुषंगाने उस्मानाबाद (धाराशिव) येथे बंधारे दुरुस्तीकरीता निधी मंजूर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) होय. हे खरे आहे.

(२) उस्मानाबाद (धाराशिव) जिल्हयात एकूण ९२० कोल्हापूर पध्दतीचे बंधारे आहेत. दुरुस्तीसाठी आवश्यक असणारे ६७१ कोल्हापूर पध्दतीचे बंधारे आहेत. त्यापैकी १७ कोल्हापूर पध्दतीचे बंधारे जिल्हा वार्षिक योजनेतून दुरुस्तीसाठी हाती घेण्यात आलेले आहेत. उर्वरित ६५४ कोल्हापूर पध्दतीचे बंधारे नादुरुस्त आहेत.

(३) व (४) होय, ६५४ कोल्हापुरी बंधाऱ्यास दुरुस्तीसाठी अंदाजे रु.४१.५० कोटी निधीची आवश्यकता आहे. त्यापैकी २९४ कोल्हापूर पध्दतीच्या बंधाऱ्यांची अंदाजपत्रके तयार असून त्यापैकी २०६ कोल्हापूर पध्दतीच्या बंधाऱ्यांची रुपये ९.९० कोटी रकमेची अंदाजपत्रके मुख्यमंत्री जलसंवर्धन योजनेंतर्गत प्रशासकीय मान्यतेसाठी प्रस्तावित आहे.

(५) बंधारे दुरुस्ती निधीबाबतची कार्यवाही चालू आहे.

----------------

## नाशिक महानगरपालिका कार्यक्षेत्रातील अनेक मोकळ्या भूखंडावर महानगरपालिकेच्या नावाची नोंद नसल्याबाबत

**(११) * ५८८३८ ॲड.राहुल ढिकले (नाशिक पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक महानगरपालिका कार्यक्षेत्रातील पंचवटी, नाशिक रोड, जेलरोड, मखमलाबाद, आडगाव, म्हसरूळ व इतर शहरी भागात महानगरपालिकेच्या मालकीच्या शेकडो मोकळ्या भूखंडावर ७/१२ भोगवटादार सदरी नाशिक महानगरपालिका नावांची नोंद नसल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मोकळ्या जागेवर भोगवटादार म्हणून नाशिक महानगरपालिकेची ७/१२ मध्ये नोंद नसल्याने अनेक समाज कंटकांनी अवैध पद्धतीने जागेचा ताबा मिळवला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी लोकप्रतिनिधींनी नगरविकास विभाग यांना दिनांक ३ ऑक्टोबर, २०२२ रोजी सदरील जागेवर महानगरपालिकेचे नाव ७/१२ भोगवटदार सदरी लावणेबाबत मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) अंशत: खरे आहे.

(२) अशी बाब निदर्शनास आलेली नाही, असे नाशिक महानगरपालिकेने कळविले आहे.

(३) व (४) मा.विधानसभा सदस्य (नाशिक पूर्व) यांनी वेळोवेळी महानगरपालिकेस पत्र देऊन, पत्रात नमूद नाशिक महानगरपालिका हद्दीतील मौजे आडगाव, मौजे म्हसरुळ, मौजे देवळाली शिवारातील खुल्या जागेस नाशिक महानगरपालिकेचे नाव लावण्याबाबत सुचना केली आहे.

तसेच, याच विषयासंदर्भात मा.विधानसभा सदस्य यांचे दि.०३.१०.२०२२ रोजीचे पत्र नगर विकास विभागास प्राप्त झालेले असून, सदर पत्रात उपस्थित केलेल्या मुद्यांच्या अनुषंगाने वस्तुनिष्ठ अहवाल सादर करण्याबाबत आयुक्त, नाशिक महानगरपालिका यांना दि.०४.०१.२०२३ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

त्याअनुषंगाने नाशिक महानगरपालिकेमार्फत अशा जागांच्या ७/१२ उताऱ्यावरील भोगवटादार सदरी महानगरपालिकेचे नाव लावण्याबाबत कार्यवाही करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अक्कलकोट (जि.सोलापूर) येथील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ परिसरात स्वतंत्र अग्निशमन यंत्रणा उभारण्याबाबत

**(१२) * ६२५०० कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अक्कलकोट (जि.सोलापूर) येथील सहाशे एकर क्षेत्रातमध्ये ९०% गारमेंट व टेक्स्टाईल कारखाने असून दोन ते अडीच लाख कर्मचारी काम करीत असल्याने तेथे स्वतंत्र अग्निशमन दल यंत्रणेची आवश्यकता असताना केवळ एकच अग्निबंब उपलब्ध असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ठिकाणी आवश्यक असलेली अग्निशमन यंत्रणा कार्यान्वित नसल्यामुळे एका यंत्रमाग कारखान्यास भीषण आग लागून कोट्यवधी रुपयांचे नुकसान झाल्याचे माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ परिसरात भविष्यात मोठी हानी होऊ नये, याकरीता सदर परिसरामध्ये स्वतंत्र अग्निशमन यंत्रणा उभारण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) व (२) सदर ठिकाणी अग्निशमन यंत्रणा कार्यान्वित नसणे, ही बाब खरी नाही.

सोलापूर शहरातील अक्कलकोट एमआयडीसीमध्ये सोलापूर महानगरपालिका अग्निशमन दलाकडून पाण्याच्या टाकीजवळ तात्पुरते पत्राशेड करुन एक अग्निबंब व एक फोम टेंडर अग्निबंब असे दोन अग्निबंब उभे करण्यात येतात.
(३) सोलापूर महानगरपालिका अग्निशमन दलाकडून अक्कलकोट रोड एमआयडीसी क्षेत्रात पाण्याच्या टाकीजवळ तात्पुरते पत्र्याचे शेड उभारुन २ अग्निशमन वाहने उभी करण्यात आली आहेत. त्यामुळे आग व अपघात प्रतिसाद कालावधी कमी झालेला आहे.

या व्यतिरिक्त सोलापूर शहरात रविवार पेठ येथे महानगरपालिकेचे मुख्य अग्निशमन केंद्र असून ते अक्कलकोट एमआयडीसीपासून ४ ते ५ कि.मी. अंतरावर आहे. त्यामुळे एमआयडीसीमध्ये आगीसारखी दुर्घटना झाल्यास तेथे अग्निबंब ५ ते ७ मिनिटात पोहचतात.

अग्निबंब वाहनांना पाणी रिफिलिंग करण्याकरीता एमआयडीसी क्षेत्रात पाणी भरण्याची सोय करण्याचे महानगरपालिकेचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## वांद्रे (मुंबई) येथील अनेक ठिकाणच्या जलवाहिन्यांच्या दुरुस्तीबाबत

**(१३) * ६११८५ श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील वांद्रे येथील भारतनगर, बेहरामनगर, जवाहर नगर, शांतीलाल कंम्पाऊंड, मराठा कॉलनी, पटेल नगर, तीन बंगला, गोळीबार, इंदिरा नगर, दौरीनगर, महाराष्ट्र नगर, गरीब नगर या सर्वसामान्यांच्या वस्त्यांमध्ये पाण्याचा पुरवठा करणारी जलवाहिनी ५० वर्षापूर्वीची जुनी झालेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जलवाहिनी जुनी झाल्यामुळे येथे नवीन जलवाहिनी टाकली असतानाही अनेक ठिकाणी पाणी गळती होत असल्याने येथील रहिवाशांना अपुरा व दूषित पाणीपुरवठा होत आहे व त्यामुळे येथील रहिवाशांचे पाण्याअभावी हाल होत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार उक्त परिसरातील नागरिकांना सुरळीत पाणीपुरवठा करण्याकरिता नवीन टाकलेल्या जलवाहिनीची दुरुस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(२) व (३) सदर परिसरातील काही ठिकाणी जुन्या व जीर्ण झालेल्या जलवाहिन्या बदलण्यात आल्या आहेत. त्यामधून पाणी गळती होत नाही.

तथापि, जुन्या जलवाहिन्यांमधून काही ठिकाणी गळत्या व त्यामुळे दुषित पाणी पुरवठा होत असल्याच्या तक्रारी प्राप्त होतात. सदर तक्रारींनुसार प्राधान्याने गळत्या दुरुस्ती करुन दुषित पाणी पुरवठ्यांच्या तक्रारींचे निराकरण करण्यात येते.

तसेच, सदर परिसरातील नागरिकांना सद्य:स्थितीत स्वच्छ व पुरेसा पाणी पुरवठा होत आहे, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मालवण (जि.सिंधुदूर्ग) नगरपालिकेच्या धामापूर नळपाणी पुरवठा योजनेसाठी गैरपद्धतीने निविदा काढल्याबाबत

**(१४) * ६३६१५ श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालवण (जि.सिंधुदुर्ग) नगरपालिकेच्या धामापूर नळपाणी पुरवठा योजनेसाठी सुमारे ४० कोटी रुपये रकमेची निविदा माहे जानेवारी, २०२३ मध्ये काढण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सरहू निविदेत दोष व त्रुटी असून बोगस कंत्राटदारांकडून हे काम करुन घेण्यात येत असून त्यात संबधित अधिकाऱ्यांचे संगनमत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू निविदा प्रणालीद्वारे नळपाणी पुरवठा योजनेचे काम बोगस कंत्राटदाराकडून करून घेतल्यामुळे सदर निविदा प्रक्रियेची सखोल चौकशी करून सदोष निविदा रद्द करावी व पारदर्शक पध्दतीने प्रक्रिया राबविण्याची मागणी माहे जानेवारी, २०२३ मध्ये माजी खासदार यांनी मा.मुख्यमंत्री, पालकमंत्री, सिंधुदुर्ग जिल्हा व मुख्याधिकारी, मालवण नगरपालिका यांच्याकडे सविस्तर निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने सखोल चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने नळपाणी पुरवठा योजनेचे काम पारदर्शक पध्दतीने करण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) मालवण नगरपरिषद पाणी पुरवठा योजना वृध्दींगत करणे या कामाकरीता दि.०३/११/२०२२ रोजी ई-निविदा प्रसिध्द करण्यात आली, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) अशा आशयाचे निवेदन मालवण नगरपरिषदेकडे प्राप्त झाले, हे खरे आहे.

(४) व (५) मालवण नगरपरिषद पाणी पुरवठा योजना वृध्दींगत करणेकामी दि.०३/११/२०२२ रोजी ई-निविदा काढण्यात आली होती.

तथापि सदर निविदेमध्ये किमान तीन तांत्रिकदृष्टया वैध ई-निविदा प्राप्त न झाल्याने निविदा फेटाळण्यात आल्या असून कोणत्याही कंत्राटदारास कार्यादेश देण्यात आलेला नाही.

याकामी फेर ई-निविदा प्रक्रिया करण्याची कार्यवाही नगरपरिषदेच्या स्तरावर करण्यात येणार आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-------------

## गोंडपिंपरी (जि.चंद्रपूर) शहरातील पाणीपुरवठा योजनेबाबत

**(१५) * ६३५५२ श्री.सुभाष धोटे (राजूरा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोंडपिंपरी (जि.चंद्रपूर) शहराला नगरपंचायतीचा दर्जा प्राप्त झाल्यांनतर १० कोटी रुपयांची पाणीपुरवठा योजना मंजूर करुन तातडीने निधी देखील उपलब्ध करुन दिला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजना १८ महिन्यात पुर्ण होणे अपेक्षित असताना ८ वर्षाचा कालावधी उलटूनही शहरवासियांना अद्यापही पाणी पुरवठा होऊ शकला नसल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर पाणीपुरवठा योजनेचे कंत्राट संबंधित नगरपंचायतीकडे पुरेसे मुनष्यबळ नसल्याने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे वर्ग केल्यानंतर देखील प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून नागरिकांची होणारी गैरसोय दूर करण्याकरिता आवश्यक ती कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) शासनाने दिनांक २१ मे, २०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये गोंडपिपरी नगरपंचायतीला वैशिष्ट्यपूर्ण कामांसाठी विशेष अनुदान या योजनेंतर्गत पाणी पुरवठा या प्रयोजनाकरीता रुपये १० कोटी इतका निधी मंजूर करण्यात आला.

सदर कामासाठी कार्यान्वयन यंत्रणा म्हणून महाराष्ट्र जीवन प्राधिकरण निश्चित करण्यात आले.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने याबाबत निविदा कार्यवाही पूर्ण करुन कंत्राटदारास पहिल्या टप्प्यातील कामाचे दिनांक १६/१/२०१९ रोजी व दुसऱ्या टप्प्यातील कामाचे दिनांक ४/९/२०२० रोजी कार्यादेश देण्यात आले.

सदर आदेशानुसार काम पूर्ण करण्याचा कालावधी अनुक्रमे दिनांक १५/८/२०२१ व दिनांक ३/३/२०२१ पर्यंत होता. तथापि, तत्कालिन कोरोना स्थिती विचारात घेऊन, तसेच जलशुद्धीकरण केंद्राची जागा योजनेकरीता उपलब्ध होण्यास झालेला विलंब विचारात घेऊन योजना तत्कालिन कालावधीत पूर्ण होऊ शकली नाही. परंतु सद्य:स्थितीत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून योजना कार्यान्वित करुन दिनांक ८/२/२०२३ पासून नागरिकांना पाणी पुरवठा करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## तळेगांव (ता.आष्टी, जि.वर्धा) येथील बस आगारातील कार्यशाळा व जीर्ण इमारतीच्या बांधकामास निधी उपलब्ध करण्याबाबत

**(१६) * ६२९३८ श्री.दादाराव केचे (आर्वी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तळेगांव (ता.आष्टी, जि.वर्धा) हे अमरावती-नागपूर व आमला-पुलगांव महामार्गाच्या मध्यभागी असलेले सन १९५५ पासूनचे जुने बस आगार असून तेथे कोणत्याही सोई-सुविधा नसल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बस आगाराचे बस स्थानक, कार्यशाळा व कार्यालयाची इमारत अत्यंत लहान असून ती जीर्ण अवस्थेत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या आगारात बस फेऱ्यांची व प्रवाशांची जास्त वर्दळ असून आगारात सोयी सुविधा नसल्यामुळे प्रवाशांची व आगारातील कर्मचाऱ्यांची गैरसोय होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार सदर बस आगारातील बस स्थानक, कार्यशाळा व कार्यालयाच्या नवीन इमारतीच्या बांधकामास तात्काळ निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) नाही.
(२) बसस्थानक, कार्यशाळा व कार्यालयाची इमारत लहान असून बसस्थानक चांगल्या अवस्थेत आहे व कार्यशाळेची इमारत जिर्ण अवस्थेत आहे.
(३), (४) व (५) सदर बसस्थानकात प्रवाशांसाठी प्रतिक्षालय, चौकशी कक्ष, प्रसाधनगृह व महिला पुरुष मुतारी, पास विक्री, केंद्र वाहतुक शाखा, लेखा शाखा प्रशासकीय कार्यालय, वाणिज्य आस्थापना रसवंती, बुकस्टॉल, नाथजल तसेच आगारात पुढील प्रमाणे सुविधा आहेत. यांत्रिकी विश्रातीगृह, बसगाळे रॅम्प, भांडार शाखा, तिकिट व रोकड शाखा, आगार व्यवस्थापक यांचे निवासस्थान, कर्मचारी सायकल स्टँड, वाशिंग रॅम्प आहे.

तसेच तळेगाव येथे सन २०२३-२४ या वर्षात रु.५०० लक्ष निधीचे बसस्थानक पुर्नबांधणीचे काम प्रस्तावित आहे.

-----------------

## शिक्रापुर (ता.शिरुर, जि.पुणे) येथील वेळ नदीपात्रात केलेल्या अनाधिकृत बांधकामांबाबत

**(१७)** * **६३६२४ ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), श्री.चेतन तुपे (हडपसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिक्रापुर (ता.शिरुर जि.पुणे) येथील पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण हद्दीतील गट क्रमांक २०२१/१ मध्ये इमारतीची परवानगी न घेता वेळ नदीकाठी अनधिकृत बांधकाम केले असल्याचे नुकतेच निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर इमारतीचा काही भाग निळया पुर रेषेच्या आत येत असल्याचे कार्यकारी अभियंता, पाटबंधारे विभाग यांनी अहवाल सादर केलेला आहे, हे ही खरे आहे काय आहे,
(३) असल्यास, सदर अनधिकृत बांधकामामुळे नदीची पाणीपातळी वाढून पूर आल्यास तेथील रहिवाशांच्या जिवितास धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन अनधिकृत बांधकाम निष्कासित करुन त्यास जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणती कायदेशीर कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.

तथापि, सदर जागेवरील अनधिकृत बांधकाम केल्याबाबत संबधितांना पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ५३(१) अन्वये नोटीस बजावली असून आपत्ती व्यवस्थापन कायदयाचा व फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १३३ च्या अंतर्गत पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून निष्कासन कारवाई प्रस्तावित आहे.

(२) होय, हे खरे आहे.

या विषयी पाटबंधारे विभागाने पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास सुनावणीसाठी उपस्थित राहण्याकरिता दि.२७.१०.२०२० रोजीने पत्र दिले आहे त्यानुसार पाहता, सदर जागेवरील इमारतीचा पूर्वेकडील काही भाग हा वेळ नदीच्या मंजूर निळया पूर नियंत्रण रेषेच्या आत असल्याचे नमूद आहे.

(३) अंशत: खरे आहे.

सदर विषयी पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने शासनास दि.०६.०८.२०२१ रोजी अहवाल सादर केला असून सदर अहवालानुसार पाहता, या अनधिकृत बांधकामामुळे पूरपरिस्थिती निर्माण झाल्यास जिवितहानी होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

(४) सदर जागेवरील अनधिकृत बांधकाम प्रकरणी निष्कासनाची कारवाई करण्यास शासनाने दि.१७/०३/२०२१ रोजीने स्थगिती दिली असून संबधितांना तात्काळ सुनावणी देऊन शासन स्तरावरुन निर्णय घेण्यात येणार आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मौजे शिळ (ता.कल्याण, जि.ठाणे) येथील डी.पी.रस्त्यावर सुरु असलेल्या अनधिकृत बांधकामाबाबत**

**(१८) * ६३५१७ श्री.प्रमोद (राजू) रतन पाटील (कल्याण ग्रामीण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे शिळ (ता.कल्याण, जि.ठाणे) येथील स.नं. १९७, २०४ व २०३ येथील डी.पी. रस्त्यावर अनधिकृत बांधकाम सुरु असल्याचे नुकतेच निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त ठिकाणी सुरु असलेल्या अनधिकृत बांधकामावर कारवाई करण्याबाबतची मागणी स्थानिक रहिवाशी तसेच लोकप्रतिनिधी यांनी लेखी निवेदनाद्वारे शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१), (२) व (३) अशा प्रकारचे निवेदन प्राप्त झाल्याची वस्तुस्थिती आहे. तथापि, सदर ठिकाणच्या अनधिकृत बांधकामांवर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम २६० (१), (२) व २६७ (१), (२) व (३) अन्वये नोटीसा बजाविण्यात आल्या असून महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना व नियोजन अधिनियम, १९६६ अन्वये गुन्हे दाखल करण्याची कारवाई करण्यात येत आहे.

तसेच सदरच्या अनधिकृत बांधकामावर निष्कासनाची कारवाई करण्यात येत असल्याची वस्तुस्थिती ठाणे महानगरपालिकेने कळविली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यातील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती अर्ज प्रक्रियेत येणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी समान संधी केंद्र स्थापन करण्याबाबत**

**(१९) * ६३७०७ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.संग्राम थोपटे (भोर),**

**श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.माधवराव पवार (हदगाव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विद्यार्थ्यांना महाडीबीटीवरील शिष्यवृत्तीसाठी अर्ज करताना ऑनलाईन पोर्टलमधील त्रुटी, कागदपत्रांच्या पूर्ततेतील अडचणी, कोलमडलेले शैक्षणिक वेळापत्रक, प्रलंबित असलेली शुल्क मंजुरी, आधारकार्डाची लिंक आदीमुळे विद्यार्थ्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याशिवाय शुल्क नियामक प्राधिकरण, समाजकल्याण विभाग, तंत्रशिक्षण संचालनालय, विद्यापीठे व महाविद्यालये अशा सर्व स्तरावर या अर्ज प्रक्रियेतील समन्वयाच्या अभावाचा थेट फटका विद्यार्थ्यांना बसत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुसार महाडीबीटीवरील अर्ज प्रक्रियांची अडचण दूर करण्यासाठी महाविद्यालयात समान संधी केंद्र स्थापन करण्याबाबत तसेच विद्यार्थ्यांना विनाविलंब शिष्यवृत्ती मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) अंशत: खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) समाज कल्याण आयुक्तालयामार्फत सर्व प्रादेशिक उपायुक्त समाज कल्याण, सर्व सहाय्यक आयुक्त समाज कल्याण यांना दि.२८/०१/२०२२ व ११/०२/२०२२ च्या पत्रकान्वये राज्यभरातील सर्व महाविद्यालयांमध्ये समानसंधी केंद्र स्थापन करण्याचे निर्देश देण्यात आलेले आहेत. त्यानुसार सद्यस्थितीत राज्यभरातील सुमारे १५८३० महाविद्यालयांपैकी ६२०२ महाविद्यालयांमध्ये समान संधी केंद्र स्थापन होऊन विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीबाबतच्या अडचणी दूर करण्याच्या दृष्टीने सदर केंद्रांमार्फत काम चालू आहे.

त्याचबरोबर मॅट्रीकोत्तर योजनांसाठी संबंधीत जिल्ह्यांचे सहायक आयुक्त यांचे कार्यालयात त्याचबरोबर प्रादेशिक उपायुक्त कार्यालय व आयुक्तालय स्तरावर विद्यार्थ्यांना विविध शिष्यवृत्ती विषयक योजनांची माहीती देणे व त्यासंबधात उद्भवणाऱ्या अडचणींचे निराकरण करण्यासाठी उपलब्ध कर्मचाऱ्यांमधून एका माहीतगार कर्मचाऱ्याची पुर्णवेळ समुपदेशक म्हणून नियुक्ती करण्याबाबतचे परिपत्रक शासनामार्फत दिनांक २८.२.२०२२ रोजी निर्गमित करण्यात आलेले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## खारघर (नवी मुंबई) येथील सेक्टर-२५ मधील सीआरझेडच्या अखत्यारीत असलेल्या भूखंडावर अनधिकृत बांधकाम केल्याबाबत

**(२०) * ५६५२० श्री.सुनील राणे (बोरीवली), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खारघर (नवी मुंबई) येथील सेक्टर-२५ मधील सीआरझेडच्या अखत्यारीत येत असलेल्या भूखंडावर मातीचा भराव टाकून रग्बी खेळासाठी सिडको प्रशासनाने इंडियन रग्बी फूटबॉल युनियनला अनधिकृतपणे जागा दिल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी पर्यावरण संस्थांनी मा.मुख्यमंत्री महोदयांकडे तक्रार दाखल केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सीआरझेड क्षेत्रातील भूखंडावर मातीचा भराव टाकणाऱ्या सिडको प्रशासनावर शासनाने कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येणार आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

रग्बी खेळाचा प्रचार व विकास करण्यासाठी आंतरराष्ट्रीय रग्बी सुविधा विकसित करण्याच्या अनुषंगाने इंडीयन रग्बी फुटबॉल युनियन यांना खारघर येथील सेक्टर-२५ मधील भूखंड क्र.२, क्षेत्र ३.५ हे.आर हा भूखंड सीआरझेड-२ मध्ये समाविष्ट असल्याने संबंधीत प्राधिकरणाकडून परवानगी घेण्याच्या अटीस अधीन "जसे आहे तसे" या तत्त्वावर सिडको संचालक मंडळाच्या ठराव क्र.१२४६१, दि.३१.७.२०२१ अन्वये दि.२५.११.२०२१ पासून पुढील ११ वर्षाच्या कालावधीसाठी भाडे करारावर (Leave and License) वाटप करण्यात आलेला आहे.
(२) व (३) यासंदर्भातील निवेदन प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही.
(४) व (५) प्रश्न उद्‍भवत नाही.

-----------------

## धानिवली (ता.मुरबाड, जि.ठाणे) येथील टेक्नोक्राफ्ट इंडस्ट्रीज लि. या कंपनीतून निघणारे रसायनयुक्त पाण्यामुळे जलस्त्रोत दुषित होत असल्याबाबत

**(२१) * ५७६४९ श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.समाधान अवताडे (पंढरपूर), श्री.विश्वनाथ भोईर (कल्याण पश्चिम), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धानिवली (ता.मुरबाड, जि.ठाणे) येथील टेक्नोक्राफ्ट इंडस्ट्रीज लि.या कंपनीतून निघणारे रसायनयुक्त दुषित पाणी नांदेणी नदी पात्रात वर्षानुवर्षे सोडत असल्याने नदीचे पात्र व पिण्याचे पाण्याचे स्त्रोत दुषित होत असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कंपनीतील रसायनयुक्त पाण्यावर प्रक्रिया करणे बंधनकारक असताना टेक्नोक्राफ्ट इंडस्ट्रीज लि.या कंपनीतून निघणारे रसायनयुक्त दुषित पाणी नांदेणी नदी पात्रात सोडल्याने पाण्यातील जलचर प्राण्याच्या जीवीताला धोका निर्माण झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार रसायनयुक्त दुषित पाणी नदीत सोडणाऱ्या संबंधित कंपनीविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) प्रश्न उद्‍भवत नाही.
(४) प्रश्न उद्‍भवत नाही.

-----------------

## महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या आगारात नवीन एस.टी बसेस उपलब्ध करण्याबाबत

**(२२) * ५८०२५ श्री.योगेशदादा कदम (दापोली), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.कैलास घाडगे पाटील (उस्मानाबाद), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.कृष्णा गजबे (आरमोरी), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव - पाथर्डी), श्री.रत्नाकर गुट्टे (गंगाखेड), श्री.अभिमन्यु पवार (औसा), श्री.संजय रायमुलकर (मेहकर), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), ॲड.आकाश फुंडकर (खामगांव), श्री.दादाराव केचे (आर्वी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या विशेषत: पुणे, अहमदनगर, खेड (जि.रत्नागिरी) मलकापूर, खामगाव (जि.बुलढाणा), धाराशिव (जि.उस्मानाबाद), गंगाखेड (परभणी), लातूर, गडचिरोली, अमरावती या जिल्ह्यातील बस आगारातील एस.टी. बसेस मोठ्या प्रमाणात कालबाह्य व नादुरुस्त असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य परिवहन मंडळाच्या विविध आगारातील एस.टी बसेस कालबाह्य व नादुरुस्त झाल्या असल्यामुळे त्या योग्य क्षमतेने सेवा देऊ शकत नसल्याने ग्रामीण भागातील एस.टी फेऱ्या कमी केल्यामुळे तसेच अनेकदा बस रस्त्यावरच बंद पडत असल्यामुळे तसेच काही एस.टी बसेस स्क्रॅपमध्ये गेल्याने त्यांचा दळणवळणावर परिणाम होत असून नादुरुस्त बस गाड्यांमधून क्षमतेपेक्षा अधिक प्रवाशी प्रवास करत असल्याने प्रवाशांची गैरसोय होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, गडचिरोली जिल्ह्यात महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळातील मानव विकास मिशन व अन्य बसेस जुन्या जीर्ण झाल्यामुळे नक्षलग्रस्त व जंगलव्याप्त मार्गात बंद पडून शाळकरी विद्यार्थी, सामान्य प्रवाशांची गैरसोय होत असून अनेकवेळा बसेसचा अपघात होत असून विद्यार्थ्यांना शाळेच्या वेळेवर बस मिळत नसल्यामुळे विद्यार्थी-विद्यार्थीनीना शाळेत पोहचण्यात व शाळेतून घरी पोहचण्यास खूप उशीर होत असल्याचेही निदर्शनास आले आहे हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास,गाड्यांची दुरुस्ती आणि देखभालीकरीता स्थायी व्यवस्था असूनही सदर यंत्रणा योग्य तऱ्हेने कार्यान्वीत नसल्यामुळे नादुरुस्त गाड्यांची वेळेवर आणि आगाराबाहेर पडण्याआधीच दुरुस्ती करणे तसेच गाड्या सुस्थितीत ठेवून प्रवाशांना अधिक चांगल्या सुविधा देण्याकरीता महामंडळाकडून कोणती उपाययोजना करण्यात आली वा येत आहे,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे, त्यानुंषगाने एसटी बसमधून प्रवास करणाऱ्या विद्यार्थी व प्रवाशांची गैरसोय दूर होण्याकरीता नवीन बसेसचा पुरवठा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) व (२) नाही.

(३), (४), (५) व (६) गडचिरोली विभागाच्या वाहन ताफ्यामध्ये १०४ इतकी मानवविकास वाहने समाविष्ट आहे. त्यापैकी १८ वाहनांचे एम एस धातूमध्ये बॉडी पुर्नबांधणीचे काम करण्यात आले आहे.

रा.प.महामंडळातील सर्व बसेसची देखभालीची कामे नियमीत केली जात आहेत व त्यानंतरच सदरच्या बसेस वाहतूकीकरीता उपलब्ध करुन दिल्या जात आहे.

विद्यार्थी व प्रवाशांची गैरसोय दूर करण्याकरीता रा.प.महामंडळाच्या ताफ्यात सध्या ७०० स्वमालकीच्या व भाडेतत्वावरील ५०० साध्या व १५० विद्युत बसेस दाखल होत आहेत. दाखल होणाऱ्या बसेसचे आवश्यकतेनुसार टप्या टप्याने विभाग निहाय वाटप सुरु आहे. तसेच स्वमालकीच्या २००० साध्या बसेस करीता चासिस खरेदीबाबत निविदा प्रक्रिया सुरु आहे.

-----------------

## गोंदिया व भंडारा येथील मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी अनुसूचित जमाती योजनेत्तर अनुदानित वसतिगृह संस्थाचालकांना अत्यल्प अनुदान मिळत असल्याबाबत

**(२३) * ६३६४४ श्री.मनोहर चंद्रिकापूरे (अर्जुनी-मोरगांव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी योजनेत्तर अनुसूचित जमाती लेखाशीर्ष २२२५ एफ १३८ अंतर्गत अनुदानित वसतिगृहांच्या संस्थांना शासनाकडून मागील पाच वर्षांपासून अत्यल्प अनुदान उपलब्ध करुन देण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर वसतिगृह सामाजिक न्याय विभागाकडून चालविण्यात येत असून निधी मात्र आदिवासी विकास विभागाकडून उपलब्ध करुन देण्यात येत असल्यामुळे त्या विभागाकडून आवश्यक निधीची अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात येत नसल्यामुळे अत्यल्प निधी उपलब्ध होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, आयुक्त समाजकल्याण यांचेकडून गोंदिया-भंडारा जिल्हयातील संस्थांना जाणीवपूर्वक इतर जिल्हयाच्या तुलनेत कमी निधी उपलब्ध करु दिला जात असल्यामुळे सन २०१६ ते डिसेंबर,२०२२ पर्यंत परिपोषण, इमारत भाडे व कर्मचारी मानधनाच्या थकीत अनुदानाची मागणी संस्थांचालकांनी व लोकप्रतिनिधींनी सामाजिक न्याय विभागाकडे करुनही अद्याप निधी उपलब्ध करुन दिलेला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार आदिवासी विकास विभागाकडून निधीची अडवणूक होत असल्यास सामाजिक न्याय विभाग विशेष घटक योजनेतून आर्थिक तरतूद करुन अनुदान उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) होय.
(२) अंशत: खरे आहे.
(३) व (४) सामाजिक न्याय विभागांतर्गत आदिवासी क्षेत्रातील अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांसाठी स्वयंसेवी संस्था संचलित मागासवर्गीय वसतिगृहासाठी आदिवासी विकास विभागाकडून लेखाशिर्ष २२२५ एफ १३८ अंतर्गत अनुदानित वसतिगृहाचे अनुदान वितरीत केले जाते. यासंदर्भात अनुदान वितरीत करण्याबाबत आदिवासी विकास विभागास पुनश्च विनंती करण्यात आली असून विभागाच्या प्रस्तावावर लवकरच आदिवासी विकास विभागाकडून निर्णय घेण्यात येत असल्याचे स्पष्ट केले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**रत्नागिरी जिल्ह्यात अवजड माल वाहने, अवजड प्रवासी वाहनांच्या योग्यता प्रमाणपत्राच्या नुतनीकरणाकरीता अद्ययावत निरीक्षण, परीक्षण (आय. अँड सी.) केंद्र उभारण्याबाबत**

**(२४) * ६३६२८ श्री.शेखर निकम (चिपळूण), श्री.निलेश लंके (पारनेर), श्री.यशवंत माने (मोहोळ), श्री.राजेश नरसिंगराव पाटील (चंदगड), कुमारी आदिती तटकरे (श्रीवर्धन) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्ह्यात अवजड माल वाहने, अवजड प्रवासी वाहनांच्या योग्यता प्रमाणपत्राच्या नुतनीकरणाकरीता पुर्वीच्या ब्रेक टेस्ट ट्रॅकवर अत्याधुनिक सक्षमता नसल्याने नूतनीकरणाचे काम दिनांक १ एप्रिल, २०२३ पासून केवळ अद्ययावत निरीक्षण, परीक्षण केंद्रामार्फत (आय.अँड सी.) करण्याचे केंद्र शासनाचे आदेश असल्याचे निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक १ एप्रिल, २०२३ पासून अत्याधुनिक केंद्रावरच अवजड वाहनांचा ब्रेक टेस्टपासून, लाईट, वाहनांची सक्षमता तपासली जाणार असून राज्यात फक्त नाशिकमध्येच अत्याधुनिक केंद्र असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाच्या आदेशावरुन आय. अँड सी. केंद्र उभारण्यासाठी प्रादेशिक परिवहन कार्यालयाने जिल्हा प्रशासनाकडे ३ एकर जागेचा प्रस्ताव दिला आहे मात्र जिल्हा प्रशासनाकडून जागा उपलब्ध न झाल्याने प्रस्ताव अद्याप प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडून जागा उपलब्ध न झाल्यास प्रमाणपत्र नुतनीकरण करणे अडचणीचे होणार असून वाहनधारकांना नुतनीकरणाकरिता परजिल्ह्यात जावे लागणार असल्याने नुतनीकरणाबाबत तात्काळ कार्यवाही करावी अशी मागणी वाहनधारकांकडून करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन अवजड माल वाहने, अवजड प्रवासी वाहनांच्या योग्यता प्रमाणपत्राच्या नुतनीकरणाकरीता अद्ययावत निरीक्षण, परीक्षण (आय.अँड सी.) केंद्र उभारण्यासंदर्भात कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे.

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) व (२) होय.

केंद्र शासनाच्या योजनेतंर्गत प्रादेशिक परिवहन कार्यालय, नाशिक येथे दि.१५.१०.२०१५ पासून अत्याधुनिक वाहन निरीक्षण व परीक्षण (आय. अँड सी.) केंद्र कार्यरत आहे.

शासनाने राज्यातील २३ ठिकाणी रस्ता सुरक्षा निधीमधून स्वंयचलित वाहन निरीक्षण व परीक्षण केंद्र उभारण्यासाठी मान्यता दिली आहे.

(३) होय.

(४) होय.

(५) सदरील जागा उपलब्ध होण्यासाठी उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, रत्नागिरी यांचेकडून तसेच शासन स्तरावरुन जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांना पत्राव्दारे कळविण्यात आले असून जागा उपलब्ध होण्यासाठी पाठपुरावा करण्यात येत आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

----------------

## शिर्डी (जि.अहमदनगर) विमानतळावर टर्मिनल बिल्डींग व पायाभुत सुविधा नसल्याने प्रवाशांची होत असलेली गैरसोय

**(२५) * ६३०७४ श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव - पाथर्डी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिर्डी (जि.अहमदनगर) विमानतळावर टर्मिनल बिल्डींग व पायाभूत सुविधा विमानतळावर प्रवाशांना विविध अडचणी येत असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जागतिक पातळीवर प्रसिध्द असलेल्या साईबाबा संस्थानामुळे भारतातून, जगभरातून येथे भाविक दर्शनासाठी येत असतात त्यामुळे केंद्र व राज्य शासनाने शिर्डी येथे आंतरराष्ट्रीय दर्जाचे विमानतळ बांधण्याचा निर्णय घेतला असून विमानांच्या फेऱ्या व प्रवाशांची संख्या वेगाने वाढत असतांना योग्य पायाभूत सुविधा मिळत नसल्यामुळे प्रवाशी, महिला, मुलांची व वृध्दांची गैरसोय होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे.

शिर्डी विमानतळावर, सुमारे ३०० प्रवासी प्रति तास क्षमतेची सुमारे २७०० चौ.मी. क्षमतेची टर्मिनल इमारत उपलब्ध आहे. तथापि, नाताळच्या सुट्टया व नवीन वर्षानिमित्त शिर्डी विमानतळावरील प्रवाशांच्या संख्येमध्ये अचानक वाढ झालेली होती व त्यामुळे डिसेंबर, २०२२ ते जानेवारी, २०२३ दरम्यान प्रवाशांना काही प्रमाणात गैरसोयीस सामोरे जावे लागले. तथापि, नाताळ व नवीन वर्षानिमित्त होणाऱ्या संभाव्य गर्दीच्या अनुषंगाने महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीने तात्पुरत्या स्वरूपाचे पीव्हीसी टेंट उभारून प्रवांशासाठी सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या. तसेच प्रवाशांना त्रास होऊ नये या उद्देशाने सुमारे ३०० वर्ग मी. क्षेत्राचे एक अतिरिक्त प्रतिक्षागृह उभारण्यात येत आहे. याचे काम लवकरच पूर्ण होणे अपेक्षित आहे.

त्याचदरम्यान, महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीने नवीन सर्व आधुनिक सुविधांयुक्त सुमारे १२०० प्रवासी प्रतितास क्षमतेच्या एकात्मिक टर्मिनल इमारतीच्या नियोजन व रेखांकनासाठी नियुक्त केलेल्या सल्लागाराकडून सदर इमारतीचा सविस्तर प्रकल्प अहवाल महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीस प्राप्त झाला असून, महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीच्या संचालक मंडळाच्या मान्यतेनुसार सदर कामासाठी लवकरच निविदा मागविण्यात येऊन हे काम पूर्ण करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे जिल्ह्यातील पिंपरी-चिंचवड इंडस्ट्रीयल इस्टेट मधील ड्रेनेज लाईन बदलून आवश्यक सोयी-सुविधा पुरविण्याबाबत

**(२६) * ६०७४२ श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), श्री.अजित पवार (बारामती), श्री.चेतन तुपे (हडपसर), ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यातील पिंपरी-चिंचवड इंडस्ट्रीयल इस्टेट येथे पन्नास वर्ष जुन्या ड्रेनेज लाईनची दुरवस्था झाली असल्याने या परिसरात वारंवार सांडपाणी रस्त्यावर येत येऊन कंपनी चालकांना गैरसोयींना सामोरे जावे लागत असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महानगरपालिकेतर्फे सदरहू कंपन्याना मुलभूत सोयी-सुविधा पुरविण्यात येत नसल्याची तक्रार उद्योजकांकडून होत असून, महानगरपालिका केवळ कर गोळा करण्याचे काम करीत असल्याने उक्त कंपन्या बंद करुन इतरत्र स्थलांतरीत होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने पिंपरी-चिंचवड इंडस्ट्रीयल इस्टेट मधील ड्रेनेज लाईन बदलण्याबाबत तसेच आवश्यक सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) अंशत: खरे आहे.

पिंपरी-चिंचवड क्षेत्रात भोसरी, पिंपरी व चिंचवड हे औद्योगिक क्षेत्र महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (MIDC) यांनी विकसित केले असून, सदरच्या औद्योगिक क्षेत्रात ड्रेनेज लाईन नाहीत.

तथापि, तत्कालीन पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण (PCNTDA) यांनी विकसित केलेल्या औद्योगिक क्षेत्रामधील पेठ क्र.७ व १० मधील इंद्रायणीनगर भागातून पाईपलाईन ना-दुरूस्त असल्याची तक्रार महानगरपालिकेकडे प्राप्त झाली होती.

(२) व (३) हे खरे नाही.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (MIDC) भागातून महानगरपालिकेस सुमारे २० ते ३० कोटी वार्षिक उत्पन्न मिळतकरातून प्राप्त होते. त्यास अनुसरून महानगरपालिकेने गेल्या ६ वर्षात रस्ते, दिवाबत्ती इ. देखभाल दुरूस्तीसाठी सुमारे २०० कोटी खर्च केले आहे. त्यामुळे महानगरपालिका फक्त कर गोळा करत असून मुलभूत सोयी-सुविधा पुरवित नाही, असे म्हणणे खरे नसल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) पिंपरी चिंचवड महानगरपालिका परिसरामधील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (MIDC) क्षेत्रात औद्योगिक भागात ड्रेनेज लाईन नाहीत. तथापि, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ (MPCB) च्या मानकांनुसार सर्व औद्योगिक कारखान्यांनी त्यांच्या सांडपाण्यावर प्रक्रीया करणे बंधनकारक आहे. त्यानुसार त्यावर नियंत्रण ठेवण्याची जबाबदारी MPCB यांची आहे.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (MIDC) व तत्कालीन पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण यांनी विकसित केलेल्या औद्योगिक क्षेत्रामधील अंतर्गत रस्ते, दिवाबत्ती, पावसाळी पाण्याची व्यवस्था इ. देखभाल दुरूस्ती कामे पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेकडे हस्तांतरीत केले असून त्याची दैनंदिन देखभाल दुरूस्ती महानगरपालिकेमार्फत केली जाते.

महानगरपालिकेमार्फत घरगुती सांडपाण्यावर प्रक्रीया करण्यासाठी आवश्यक क्षमतेचे मैलाशुध्दीकरण केंद्रे कार्यान्वित करण्यात आली आहेत.

परंतू औद्योगिक सांडपाणी महानगरपालिकेच्या STP मध्ये प्रक्रीयेसाठी घेता येत नाही, त्यासाठी औद्योगिक क्षेत्रामध्ये निर्माण होणारे औद्योगिक सांडपाणी (Effluent) एकत्रित गोळा करून त्यावर प्रक्रिया करण्यासाठी सामाईक प्रक्रिया केंद्र CETP (Common Effluent Treatment Plant) उभारण्याचे नियोजन MCCIA, MIDC व MPCB यांचे असून यासाठी संयुक्त SPV (Special Purpose Vehicle) कंपनी स्थापन करण्यात आली असून पुढील कार्यवाही SPV मार्फत सुरू आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबई-पुणे द्रुतगती मार्गाच्या टोल वसुलीच्या कालावधीत वाढ केल्याबाबत

**(२७) * ५८१५८ श्री.धनंजय मुंडे (परळी), श्री.अनिल पाटील (अमळनेर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-पुणे द्रुतगती मार्गाच्या आठ पदरीकरणासाठी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने सदर मार्गावरील टोल वसुलीच्या कालावधीत वाढ करण्याची मागणी माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील महामार्गावरील टोल वसुलीचा कालावधी वाढविला तर सन २०४५ पर्यंत नागरिकांना विनाकारण टोल भरावा लागणार असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने सदरील प्रस्तावाबत कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) व (२) नाही, हे खरे नाही.

मात्र, मुंबई-पुणे यशवंतराव चव्हाण द्रुतगती मार्गातील खोपोली एक्झीट ते कुसगाव (सिंहगड संस्था) या भागातील १२ कि.मी.च्या राहीलेल्या लांबीसाठी मिसिंग लिंक (Missing Link) दोन बोगदे व २ व्हायाडक्टसह ८ पदरी नवीन रस्ता बांधण्याच्या कामास व खालापूर फुडमॉल ते खोपोली इंटरचेंज दरम्यान ८ पदरी उन्नत मार्ग बांधण्यास मान्यता देण्यात आली असून सदर मिसिंग लिंक (Missing Link) प्रकल्पाचे बांधकाम, सवलत कालावधीतील देखभाल दुरुस्ती, सध्याच्या द्रुतगती मार्गाची दुरुस्ती सन २०३० पासून मिसिंग लिंक (Missing Link) प्रकल्पाचा सवलत कालावधी इतक्या कालावधीतील देखभाल दुरुस्ती व परिचालन यासाठी येणाऱ्या खर्चाच्या प्रतिपूर्तीसाठी पथकर कालावधी दिनांक ३०.०४.२०४५ पर्यंत निश्चित करण्यास दिनांक २४.११.२०१७ चे शासन निर्णयाव्दारे मान्यता देण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पुणे महानगरपालिकेने स्पायडर मशीनद्वारे नालेसफाई करण्यासाठीच्या निविदा प्रक्रियेत केलेली अनियमितता

**(२८) * ५८९५३ श्री.चेतन तुपे (हडपसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महानगरपालिकेकडून स्पायडर मशीनद्वारे नाले साफसफाई करण्याच्या कामासाठीची निविदा प्रक्रिया राबविण्यात आली असल्याचे नुकतेच निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निविदा प्रक्रियेत ताशी भाडे तत्वावर मशिनसाठी देय रक्कम ही मशिनच्या मूळ किमतीपेक्षा जास्त असल्यास पुणे महानगरपालिकेने स्वमालकीची मशिनरी विकत घ्यावी असा ठराव स्थायी समितीने केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी स्पायडर मशिन भाडे तत्वावर घेण्यासाठी एक कोटी रुपयाच्या आसपास किंमत असलेली मशीन पाच कोटी रुपयांची निविदा विभागून मागविण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, पुणे महानगरपालिकेने ताशी भाडे तत्वावर भाडे आकारण्याचा DSR मध्ये समाविष्ट असलेला दर अधिकचा दाखविण्यात आलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, तासिका पद्धतीने निविदा मागविणे ऐवजी मापन पद्धतीने निविदा मागविण्यात आली असून निविदेमध्ये मशिनरीचा प्रकार नमूद न करता विशिष्ट कंपनीचे नाव नमूद करुन निविदा मागविण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, पुणे शहरात या कंपनीचे केवळ ५ मशीनधारक असून याच मशिनधारकांना अनेक वर्षे निविदा देण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(७) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने झालेल्या अनियमिततेबाबत संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) सदरची स्पायडर मशीन ही भारताबाहेरील असून त्याची किंमत अंदाजे रु.३,६४,२८,७३९/- एवढी आहे.

पुणे महानगरपालिका हद्दीमध्ये सद्यस्थितीत १५ क्षेत्रीय कार्यालय असून त्यांचे ५ झोन करण्यात आले आहेत व प्रत्येक झोनसाठी रुपये १ कोटीची निविदा याप्रमाणे ५ निविदा मागविण्यात आल्या होत्या.

(४) हे खरे नाही.

(५) हे खरे नाही. DSR मध्ये नमुद दराप्रमाणे तासिका पध्दतीने निविदा मागविण्यात आलेल्या आहेत.

(६) अंशत: खरे आहे. निविदा प्रक्रिया राबवून न्युनतम निविदा धारकास निविदा देण्यात येते.

(७) या कामासाठी राबविण्यात आलेली निविदा प्रक्रियेत निकोप स्पर्धा झालेली नसल्याने पुर्वीच्या निविदा रद्द करुन फेर निविदा मागविण्यात आल्या असल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.

-----------------

## इगतपूरी (जि.नाशिक) शहरातील मतीमंद आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना अन्नातून झालेली विषबाधा

**(२९) * ५८१६३ श्रीमती सरोज आहिरे (देवळाली), श्री.अजित पवार (बारामती) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इगतपूरी (जि.नाशिक) शहरातील मतीमंद आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना अन्नातून विषबाधा होऊन त्यात २ विद्यार्थ्यांचा दुर्दैवी मृत्यू झाल्याचे दिनांक २४ ऑगस्ट, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर घडलेल्या घटनेत सहा विद्यार्थी अत्यवस्थ झाल्यामुळे त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरु आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात चौकशी करण्यात आली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने दोषी असलेल्या संबंधिताविरुध्द कारवाई करण्यासह विद्यार्थ्यांना उच्च दर्जाचे व सकस आहार देण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) होय, उपचार सुरु होते.

उक्त दिव्यांग पुनर्वसन केंद्रांतर्गत असलेल्या शाळेमधील २ विद्यार्थ्यांना जिल्हा रुग्णालय नाशिक व ४ विद्यार्थ्यांना ग्रामिण रुग्णालय, इगतपूरी येथे उलट्या व जुलाबाच्या उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. तद्नंतर त्यांची प्रकृती सुधारल्यामुळे सर्व सहा विद्यार्थ्यांना रुग्णालयातून डिस्चार्ज दिला आहे.

(३) होय.

सदर संस्थेस केंद्र किंवा राज्य सरकार मार्फत कोणतेही अनुदान दिले जात नाही. उक्त शाळांमधील २ विद्यार्थ्यांच्या मृत्यूचे नेमके कारण कोणते यासंदर्भात शासकीय वैद्यकिय महाविद्यालय व रुग्णालय, औरंगाबाद यांचेकडून प्राप्त व्हिसेरा अहवाल, प्रादेशीक फॉरेन्सीक विज्ञान प्रयोगशाळा, गृह विभाग, महाराष्ट्र राज्य, नाशिक यांच्याकडील तपासणी अहवालानुसार १) हर्षल भोईर याच्या मृत्यूबाबत Death due to coronary artery disease and its sequelae व २) मोहम्मद जुबेर मुस्तफा शेख याचे मृत्यूबाबत Death due to cerebro-pulmonary edema to its sequelae असे अभिप्राय वैद्यकिय अधिकारी यांनी नमूद केले आहेत. तसेच प्रादेशिक फोरेन्सिक विज्ञान प्रयोगशाळा, गृह विभाग, नाशिक यांच्या सदर विद्यालयातील अन्न व पाणी तपासणी अहवालात General and Specific chemical testing does not reveal any poison असे नमूद करण्यात आले आहे.

सदर पुण्यात्मा प्रभाकर शर्मा मंडळ, मुंबई या संस्थेस, त्यांचे संचलित १) अनुसुयात्मजा मतिमंद निवासी विद्यालय, इगतपूरी, ता.इगतपूरी, जि.नाशिक, २) इंदिरा भारती कर्णबधीर निवासी विद्यालय, इगतपूरी व ३) रुक्माबाई अपंग युवक स्वयंसहाय्यता केंद्रांसहीत, इगतपूरी या तीन केंद्रांना अपंग क्षेत्रात कार्य करण्यासाठी नोंदणीप्रमाणपत्र क्र.ए-१०३३, दि.१३.०६.२०१७ ते १२.०६.२०२२ पर्यंत प्रदान करण्यात आले आहे. उक्त घटनेच्या अनुषंगाने सदर तिनही केंद्रांचे नोंदणी प्रमाणपत्र रद्द करणेबाबत जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांच्या शिफारशीवर आयुक्त, दिव्यांग कल्याण, पुणे यांनी दि.२३.०१.२०२३ रोजी सुनावणी घेतली असून त्यानुषंगाने पुढील कार्यवाही आयुक्तालय स्तरावर सुरु आहे.

विद्यार्थ्यांना उच्च दर्जाचे व सकस आहार देणे सर्व व्यवस्थापन यांना बंधनकारक असून, त्यानुसार उक्त संस्थांनी FSSAI कडे नोंदणी करुन सदर प्रमाणपत्र प्राप्त केले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील नोंदणी नसणाऱ्या अनधिकृत हॉटेल व खाद्यगृहांवर कारवाई करण्याबाबत

**(३०) * ६०५५६ श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत नोंदणी नसणाऱ्या अनधिकृत हॉटेलची संख्या अनेक हजारच्या घरात असून प्रसिद्ध खाद्यगृहाच्या नावाशी साधर्म्य साधणाऱ्या नावाने झोपडपट्टीमध्ये खाद्यगृह चालविले जात असल्याने मुंबईकरांच्या जीवाशी खेळ सुरू असल्याचे नुकतेच निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईत १५००० उपहारगृह व त्याच्या तीनपट अनधिकृत उपहारगृहे असून त्यापैकी ३९४ अनधिकृत उपहारगृह चालकांकडे परवाना तसेच अग्निशमन विभागाचे ना-हरकत प्रमाणपत्र नसून कित्येक उपहारगृहे ही झोपड्यांमध्ये चालवली जात असल्याचे समोर आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, हॉटेल संदर्भात अन्न आणि औषध प्रशासनाकडे नोंदणी व फायर सेफ्टी ऑडिट बंधनकारक असताना सर्व नियमांचे उल्लंघन करुन अनधिकृत हॉटेल व्यावसायिक निकृष्ट दर्जाचा भाजीपाला, मसाले, तेल वापरुन अन्नाच्या किंमती कमी करीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणांची शासनाने चौकशी करुन मुंबईतील अनधिकृत हॉटेल व खाद्यगृहांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील झोपडपट्टीमध्ये प्रसिध्द खाद्यगृहाच्या नावाशी साधर्म्य साधणाऱ्या नावाने खाद्यगृह चालविले जात असल्याचे निदर्शनास आलेले नाही, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(२) बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रात एकूण ६८११ अनुज्ञापत्रीत उपहारगृहे आहेत. तथापि, नोंदणी नसणाऱ्या अनधिकृत हॉटेल्सवर मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ च्या कलम ३९४ अंतर्गत कारवाई करण्यात येते, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(३) महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम २००६ मधील कलम ३(३) नुसार आस्थापनेचे मालक/भोगवटादार यांनी आस्थापनेमधील अग्निप्रतिबंधक यंत्रणा सुस्थितीत असल्याबाबतची माहिती प्रपत्र "ब" द्वारे परवानाप्राप्त अभिकरणामार्फत अग्निशमन विभागास माहे जानेवारी व जुलै असे वर्षातून दोनदा सादर करणे बंधनकारक आहे, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

अनधिकृत हॉटेल व्यावसायिक अन्नाच्या किंमती कमी करण्यासाठी निकृष्ट दर्जाचा भाजीपाला, मसाले, तेल वापरत असल्याची बाब निदर्शनास आलेली नाही, असे वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाने कळविले आहे.

(४) बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील अनधिकृत उपहारगृहांवर माहे जानेवारी ते डिसेंबर, २०२२ दरम्यान मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ च्या कलम ३९४ अन्वये १५२२ तपासणी अहवाल दाखल करण्यात आले आहेत व १२४७ प्रकरणांमध्ये न्यायालयीन कारवाई करण्यात आली आहे. तसेच, माहे जानेवारी २०२३ मध्ये २६० तपासणी अहवाल दाखल करण्यात आले आहेत व १४६ प्रकरणांमध्ये न्यायालयीन कारवाई करण्यात आली आहे.

मुंबई अग्निशमन विभागाचे अग्निसुरक्षा प्रमाणपत्र आढळून न आलेल्या तसेच, सदर प्रमाणपत्रामध्ये त्रुटी आढळून आल्यास, अशा उपहारगृहांवर महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम २००६ नुसार कारवाई करण्यात येते, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

अन्न व औषध प्रशासनामार्फत अन्न आस्थापनांची नियमित व वेळोवेळी तपासणी करुन तसेच अन्न पदार्थांचे नमुने विश्लेषणासाठी घेऊन त्याअनुषंगाने अन्न सुरक्षा व मानके कायद्यांतर्गत कारवाई करण्यात येते. तसेच तपासणी अहवालातील त्रुटींच्या अनुषंगाने व कायद्यातील तरतुदींचे उल्लंघन झाल्याचे आढळल्यास संबंधितांवर कारवाई करण्यात येत आहे, असे वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाने कळविले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नाशिक शहराकरीता अमृत-२ योजनेंतर्गत पाणी पुरवठा आराखड्यास मंजुरी देण्याबाबत

**(३१) * ५८९९५ ॲड.राहुल ढिकले (नाशिक पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक शहरातील नाशिकरोड, पंचवटी व जेलरोड विभागातील परिसरासाठी नाशिक महानगरपालिकेमार्फत विविध पाणीपुरवठा योजनेंतर्गत दुषित, अशुद्ध व कमी दाबाने पिण्याच्या पाण्याचा पुरवठा होत असल्याने स्थानिक नागरिकांमध्ये असंतोषाचे वातावरण निर्माण झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील नाशिक रोड, जेलरोड, पंचवटी विभागातील तसेच उर्वरित नाशिक शहरातील नागरिकांना शुद्ध व पुरेसे पाणी उपलब्ध होण्यासाठी अमृत-२ योजनेंतर्गत नाशिक शहरातील जुन्या रॉ वॉटर ट्रान्समिशन व

शुध्द पाण्याच्या वितरण वाहिन्या बदलणे रु.३५० कोटी, नाशिकरोड विभागासाठी दारणा धरणातून थेट पाईपलाईनव्दारे पाणी पुरवठा करणे रु.२५० कोटी, नाशिकरोड व पंचवटी विभागसह इतर विभागात डी.एम.ए झोन तयार करणे व नवीन वितरण व्यवस्थेत सुधारणा करणे रु.१५० कोटी अशी एकूण ७५० कोटीच्या रुपयांचा पाणी पुरवठा प्रकल्प आराखडा मंजुरीसाठी माहे ऑगस्ट, २०२० मध्ये शासनाकडे सादर करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरील अमृत-२ योजनेंतर्गत पाणी पुरवठा आराखडा प्रकल्प मंजुरी अभावी नगरविकास विभागाकडे अद्यापपर्यंत प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार सदरील प्रलंबित अमृत-२ योजनेंतर्गत पाणी पुरवठा आराखड्यास तातडीने मंजुरी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) नाशिक महानगरपालिका क्षेत्रातील नाशिक रोड विभागात नाशिक रोड जलशुद्धीकरण केंद्र व गांधीनगर जलशुद्धीकरण केंद्र येथून पाण्याचा पुरवठा होतो.

नाशिक रोड जलशुद्धीकरण केंद्रास दारणा नदीवरील चेहेडी बंधाऱ्यातुन कच्चे पाणी (रॉ वॉटर) पुरविले जाते. दिनांक ०२ डिसेंबर, २०२० दरम्यान चेहेडी बंधारा येथे कच्च्या पाण्यात (रॉ वॉटर) वालदेवी नदीतुन वाहून आलेल्या सुक्ष्म लाल अळया (लार्वी) आढळून आल्या होत्या.

तद्नंतर, नाशिक महानगरपालिकेमार्फत दारणा नदीवरील चेहेडी बंधाऱ्यातुन कच्चे पाणी (रॉ वॉटर) उचलणे त्वरित बंद करून गंगापूर धरणातील थेट पाईपलाईनद्वारे कच्चे पाणी (रॉ वॉटर) नाशिक रोड जलशुद्धीकरण केंद्रात घेऊन शहरास स्वच्छ पाणी पुरवठा करण्यात आला आहे व आजही करण्यात येत आहे असे नाशिक महानगरपालिकेमार्फत कळविण्यात आले आहे.

तसेच, सद्यस्थितीत शहरास स्वच्छ पाणीपुरवठा सुरु असुन नियमितपणे पाण्याचे नमुने शासकीय प्रयोगशाळेत तपासले जात असून सदर पाण्याचे नमुने पिण्यायोग्य असल्याचे नाशिक महानगरपालिकेमार्फत कळविण्यात आले आहे.

(२), (३) व (४) केंद्र पुरस्कृत अमृत २ अभियानांतर्गत नाशिक महानगरपालिकेच्या रुपये ३५० कोटी रुपये किंमतीच्या जुन्या वॉटर ट्रान्समिशन व शुद्ध पाण्याच्या वितरण वाहिन्या बदलणे या प्रकल्पास अमृत अभियानांतर्गत गठीत केंद्र शासनाच्या शिखर समितीने मान्यता दिलेली असून सद्यस्थितीस सदर प्रकल्पाचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करून महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास तांत्रिक मान्यतेस्तव आयुक्त, नाशिक महानगरपालिका यांनी सादर केला आहे. सदर प्रकल्पास तांत्रिक मान्यता प्राप्त झाल्यानंतर सदर प्रकल्पाचा प्रस्ताव अमृत अभियानांतर्गत गठीत तांत्रिक समितीसमोर मान्यतेस्तव सादर करण्यात येईल.

तसेच, दारणा डॅम पासून पाणीपुरवठ्याची लाईन टाकणे व नवीन विकसित भागात जलवाहिन्या टाकणे असे दोन प्रकल्पाचे प्रस्ताव केंद्र पुरस्कृत अमृत २.० अभियानाच्या पोर्टलवर नाशिक महानगरपालिकेमार्फत सादर केले आहेत. सदर प्रस्ताव या अभियानांतर्गत मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील गठीत राज्यस्तरीय उच्चाधिकार सुकाणू समितीसमोर सादर करण्यात येतील.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सामाजिक न्याय विभागांतर्गत विविध योजनांचे लाभार्थी शोधण्यासाठी `समतादूत' प्रकल्प राबविण्यात झालेला गैरव्यवहार

**(३२) * ५६८८५ श्री.सुनील राणे (बोरीवली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), अॅड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.विनोद निकोले (डहाणू) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सामाजिक न्याय विभागांतर्गत विविध योजनांचे लाभार्थी शोधण्यासाठी `समता दूत' प्रकल्प राबविण्याचा शासनाने निर्णय घेतल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सामाजिक न्याय विभागाच्या अंतर्गत `समतादूत' प्रकल्प राबविण्यासाठी `सी-डॅक' या सॉफ्टवेअर कंपनीच्या मदतीने सॉफ्टवेअर व मोबाईल अॅप्लिकेशन विकसित करण्यासाठी कंत्राटी पद्धतीने कर्मचारी नेमून त्यांना सर्वेक्षण करता यावे याकरिता ७०० भ्रमणध्वनीचे संच खरेदी करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, काही काळात `सी-डॅक'ने सांकेतांक संदर्भ क्रमांक (Source Code) देणे बंद केल्यामुळे सर्वे फॉर्म भरताना मोबाईल अॅप्लिकेशन वापरणे बंद झाले व मोबाईल तसेच पडून राहिले तसेच `सी-डॅक' कडून सांकेतांक मिळवण्यासाठी `बार्टी'च्या अधिकाऱ्यांकडून प्रयत्न न झाल्यामुळे अॅप्लिकेशन, सॉफ्टवेअर व मोबाईलवर केलेला खर्च वाया जाऊन सदरचा अधिकाऱ्यांच्या सदोष कार्यपद्धतीमुळे प्रकल्पाची अंमलबजावणी करण्यात आली नसल्याने याप्रकरणी गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, विविध योजनांचे लाभार्थी शोधण्यासाठी `समतादूत' कार्यक्रम योजनेसाठी आणि विविध भागातील गरिबांना सुविधांचा व योजनांचा लाभ मिळण्यासाठी नाविन्यपूर्ण योजना राबविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करुन `समतादूत' प्रकल्प राबवण्यात झालेला गैरव्यवहार व अनियमितता प्रकरणी संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) विविध योजनांच्या अंमलबजावणीकरिता सामाजिक न्याय विभागांतर्गत समतादूत हा प्रकल्प सन २०१४ पासून सुरु करण्यात आलेला आहे.

(२) होय.

(३) व (४) हे खरे नाही.

सदर मोबाईल अॅप्लीकेशन व डॅशबोर्ड या दोन्ही सॉफ्टवेअरचा सन २०१५-१६ या वर्षात समतादूतामार्फत वापर केला गेला आहे व त्यांचे संनियंत्रण (Monitoring) हे samatadoot.barti.in/Monitoring.aspx या URL द्वारे करण्यात येत होते. सदर सॉफ्टवेअर व अॅप्लीकेशन हे सुरु होते. सी-डॅक संस्थेमार्फत तयार करण्यात आलेला समतादूत मोबाईल अॅप्लीकेशन हे १ वर्ष कालावधीकरिता होस्ट करण्यात आले होते. त्याप्रमाणे सदर कालावधीमध्ये सॉफ्टेवअर चालू होते. सद्य:स्थितीत सर्व समतादूतांकडे स्वत:चे अद्ययावत तंत्रज्ञानाचे मोबाईल असल्याने त्याद्वारे समतादूत याबाबतचा अहवाल सादर करतात.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**अभिमत विद्यापीठातील मागासवर्गीय आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांप्रमाणे मान्यताप्राप्त खाजगी व्यवस्थापनेच्या संस्थेतील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचा लाभ मिळणेबाबत**

**(३३) * ६३६३१ श्री.शेखर निकम (चिपळूण), श्री.निलेश लंके (पारनेर), श्री.यशवंत माने (मोहोळ), श्री.राजेश नरसिंगराव पाटील (चंदगड), कुमारी आदिती तटकरे (श्रीवर्धन) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील २१ अभिमत विद्यापीठातील मागासवर्गीय आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील १४ हजार २३२ विद्यार्थ्यांना राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेचा लाभ देण्याचा निर्णय राज्य मंत्रीमंडळाने घेतल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विद्यापीठाची मान्यता असणाऱ्या खाजगी संस्थेच्या बी.एस्सी., आय.टी., कॉम्प्युटर सायन्स, हॉटेल मॅनेजमेंट (हॉस्पिटॅलिटी मॅनेजमेंट), बी.बी.एम. (बी.एम.एस.) तसेच आय.टी.आय. या सारख्या महत्वाच्या शासकीय कोटा व व्यवस्थापन कोटा या दोन्ही प्रक्रियेतून प्रवेश घेणाऱ्या शहरी व ग्रामीण भागातील गरीब आणि मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचा लाभ मिळत नसल्याने या शिष्यवृत्ती योजनेपासून वंचित राहत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अभिमत विद्यापीठाची प्रवेश प्रक्रिया आणि खाजगी व्यवस्थापनेच्या शाखेतील प्रवेश प्रक्रिया ही सारखीच असल्याने सर्व विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचा लाभ देण्याबाबत शासनाने निर्णय घेण्याची आवश्यकता आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, विद्यापीठाची मान्यता असणाऱ्या खाजगी संस्थेच्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचा लाभ मिळणेसंदर्भात शासनाकडून कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) अशत: खरे आहे.

राज्यातील केवळ आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेचा लाभ देण्याचा निर्णय राज्य मंत्रीमंडळाने माहे जानेवारी, २०२३ मध्ये घेतला आहे.

त्यानुषंगाने उच्च व तंत्रशिक्षण विभागाने राज्यातील अभिमत विद्यापीठातील विविध प्रशासकीय विभागांच्या नियंत्रणाखालील व्यावसायिक अभ्यासक्रमांचे शिक्षण घेणाऱ्या व राज्य शासनाच्या प्रचलित धोरणानुसार परीक्षा शुल्क व शिक्षण शुल्क प्रतिपूर्तीकरीता पात्र ठरणाऱ्या व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांना सन २०२२-२३ ह्या शैक्षणिक वर्षापासून राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेचे लाभ अनुज्ञेय करण्याबाबत दि.२३.०२.२०२३ रोजी शासन निर्णय निर्गमित केलेला आहे.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या UGC (Institutions Deemed to be Universities) Regulations, २०१९, दि.२०.०२.२०१९ यानुसार राज्यातील प्रत्येक अभिमत विद्यापीठाने त्यांच्या अधिनस्त विद्यापीठे, संस्था यामध्ये प्रवेश व शुल्क याबाबतची प्रशासकीय संरचना स्थापित करण्याची, त्याचप्रमाणे प्रवेशित विदयार्थी, शुल्क याबाबतची माहितीपुस्तिका (Prospectus) ही संस्थेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्याची कार्यवाही करणे क्रमप्राप्त आहे.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## आळंदी (ता.खेड, जि.पुणे) येथील सिद्धबेटातील नदी पात्रातील जलपर्णीमुळे नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण झाल्याबाबत

**(३४) * ६१५६२ श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), श्री.चेतन तुपे (हडपसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आळंदी (ता.खेड, जि.पुणे) येथील सिद्धबेटातील ऐतिहासिक मंदिरालगत असलेल्या नदीमध्ये मोठ्या प्रमाणात वाढलेल्या जलपर्णी वनस्पतीमुळे अनेक ठिकाणी पाणी तुंबून डासांचा मोठ्या प्रमाणात प्रादुर्भाव झाल्याने नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, डासांच्या प्रादुर्भावामुळे डेंग्यू, चिकुनगुनिया, स्वाईन फ्ल्यू या नव्याने उद्भवलेल्या आजारांचे प्रमाण वाढले असून रक्त तपासणी, सोनोग्राफी, एक्स-रे इ. महागड्या तपासण्यांसाठी गरीब नागरिकांना पुणे महानगरपालिकेकडून आरोग्य सेवा पुरेशा प्रमाणात मिळत नसल्याने तसेच त्यांना खाजगी दवाखान्यात जावे लागत असल्याने मोठ्या प्रमाणात आर्थिक पिळवणूक होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार नदीमधील जलपर्णी वनस्पती काढून टाकण्यासाठी तसेच परिसरातील नागरिकांना योग्य त्या आरोग्य सुविधा देण्याकरिता शासनाकडून कोणत्या स्वरुपाची कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

सदर रुग्णांची महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाकडून मोफत तपासणी करण्यात येते. तसेच रक्त तपासणी, सोनोग्राफी, एक्स-रे इत्यादी तपासण्या कमी दराने उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत.

या व्यतिरिक्त पुणे महानगरपालिका रुग्णालयामध्ये रुग्णांना मोफत औषधोपचार करण्यात येतात.

(३) इंद्रायणी नदी ही पिंपरी-चिंचवड शहरातून प्रवाहित होत असून शहराच्या कार्यक्षेत्रातील सिंटेल कंपनी, तळवडे ते हिरामाता मंदिर, चऱ्होली एस.टी.पी. प्लांट हा २० कि.मी. अंतराच्या नदी पात्राचा भाग असून यामध्ये आळंदी नगरपरिषद क्षेत्रातील सिद्धबेट येथील १.५ कि.मी. चा नदीपात्राचा भाग येतो.

या संपूर्ण भागातील जलपर्णी काढण्यासाठी पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने ठेकेदाराची नियुक्ती करुन जलपर्णी पुर्णत: काढून टाकण्याचे काम करण्यात आले आहे. सद्य:स्थितीत या पट्ट्यात जलपर्णी नाही.

भविष्यात देखील सदर भागात जलपर्णी नियमितपणे काढून घेण्यासाठी पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेकडून नियोजन करण्यात येत आहे.

या व्यतिरिक्त आळंदी नगरपरिषदेकडून आळंदी शहरात व नदीघाट परिसरामध्ये तसेच सांडपाणी ठिकाणी नियमितपणे धूर फवारणी करुन डासांचा प्रार्दूभाव होऊ नये, यासाठी खबरदारी घेण्यात येते.

तसेच नगरपरिषदेकडून नदीपात्र शेजारील लोकवस्त्यांमध्ये जाऊन साठलेल्या पाण्याचा नियमित सर्वे करुन डेंगू डासांची वाढ होऊ नये, यासाठी पाण्यामध्ये द्रवरुप औषध टाकून (अबेटींग) अळया नष्ट केल्या जातात.

याबाबत नागरिकांमध्ये ग्रामीण रुग्णालयाच्या मार्गदर्शनाखाली नियमितपणे जनजागृती देखील करण्यात येते.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

### पिंपरी-चिंचवड (जि.पुणे) महानगरपालिकेत सुरु असलेल्या गैरकारभाराबाबत

**(३५) * ६३६०२ श्रीमती सरोज आहिरे (देवळाली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यातील पिंपरी-चिंचवड महानगपालिकेत कर आकारणी, कर संकलन विभागातील मुळ अभिलेख गहाळ करणे, नोटराईजद्वारे बेकायदेशीर नोंदी करणे, एकाच दस्तावर अनेक बेकायदेशीर नोंदी लावणे इत्यादी गैरकारभार होत असल्याचे दिनांक ५ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेत सुरु असलेल्या गैरकारभाराबाबत लोकप्रतिनिधी यांनी आयुक्त, महानगपालिका यांना दिनांक २५ जानेवारी, २०२३ रोजी महानगरपालिका आवक क्र.१०११ अन्वये पत्र दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणाची शासनाने सखोल चौकशी करुन दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) तक्रारी प्राप्त झाल्या असल्याचे महानगरपालिकेने कळविलेले आहे.

(२) हे खरे आहे.

(३) या प्रकरणी पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने चौकशी केली असून या तक्रारींमध्ये कोणतीही अनियमितता झाल्याचे दिसून येत नसल्याचे महानगरपालिकेने कळविलेले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

### कल्याण–डोंबिवली (जि.ठाणे) महानगरपालिकेत मे.शॉर्प सर्व्हीसेस या कंपनीने ठेकेदारांशी संगनमत करुन केलेला गैरव्यवहार

**(३६) * ६०५६१ श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील कल्याण–डोंबिवली महानगरपालिकेच्या सुरक्षा विभागाने २५० पुरुष अटेन्डंट (अकुशल कामगार) पुरविण्याबाबत ‘ई’ निविदा नोटीस क्र.२ सन २०२१-२२ मध्ये प्रसिध्द केली असून, त्यानुसार माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये म्हणजेच एका वर्षानंतर मे.शार्प सर्व्हीसेस, सायन, मुंबई यांना रुपये १२ कोटी ८६ लाख ८८ हजार रुपयांची निविदा दोन वर्षाकरिता मंजूर करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कंपनीने १०० ते १२५ अकुशल कामगारांची खोटी कागदपत्रे लेखा विभागाला सादर केली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त कंपनीने महानगरपालिकेला खोटी कागदपत्रे सादर केल्यानंतर जे अकुशल कामगार पुरविण्यात आलेले आहेत त्याचा पीएफ देखील निविदेमध्ये नमुद केल्याप्रमाणे जमा न केल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू कंपनीने ठेकेदारांशी संगनमत करुन खोटी कागदपत्रे सादर करुन महापालिकेची दिशाभूल करुन फसवणूक केल्याप्रकरणी सदर कंपनीची सखोल चौकशी करुन कारवाई करण्याबाबत तसेच कोणतेही देयक अदा न करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.

कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या सुरक्षा विभागासाठी १४५ अकुशल कामगार, पाणी पुरवठा विभागासाठी ८९ व घनकचरा व्यवस्थापनासाठी १६ असे एकूण २५० अकुशल कामगार पुरविण्यासाठी 'ई' निविदा दि.३०.०८.२०२१ रोजी प्रसिध्द करण्यात आली होती. त्यानुसार एकूण ०४ निविदा प्राप्त झाल्यानंतर कागदपत्रांच्या छाननीअंती दि.२६.११.२०२१ रोजीच्या निविदा समितीच्या इतिवृत्तानुसार मे.शॉर्प सर्व्हीसेस यांची निविदा किमान वेतन कायद्यानुसार न्यूनत्तम स्वीकृती दराप्रमाणे असल्याने L-१ ठरविण्यात आली होती.

त्यानुसार दि.०७.०९.२०२२ रोजी मे. शॉर्प सर्व्हीसेस यांना कार्यादेश देण्यात आला.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

मे.शॉर्प सर्व्हीसेस कंपनीला दि.०७.०९.२०२२ रोजी कार्यादेश दिल्यानंतर कंपनीकडून माहे ऑक्टोबर, २०२२ चे मासिक देयक दि.१७.११.२०२२ रोजी प्राप्त झाले.

सदर देयकासोबत २३४ अकुशल कामगारांचे E.P.F. व E.S.I.C. चे एकत्रित चलन प्राप्त झाले. त्याअनुषंगाने महानगरपालिकेच्या लेखा विभागाकडून सदर बील अदायगी करतांना GST रक्कम आकारण्याबाबत मार्गदर्शन मागविण्यात आले. सदर बाबत अभिप्राय दि.०१.०२.२०२३ रोजी प्राप्त झाले. त्यानंतर संबंधित ठेकेदाराला करारनाम्यातील अट क्र. ५ व अट क्र. १८ अन्वये नमूद कागदपत्रांची पूर्तता करणेस दि.०६.०२.२०२३ च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

(४) ठेकेदाराने करारनाम्यातील अट क्र. ५ व अट क्र. १८ अन्वये कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर मे. शॉर्प सर्व्हीसेस यांना मासिक देयकांची अदायगी करण्यात येणार असल्याचे कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने कळविले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**राजेन्द्र भागवत**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.